सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. २६ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ११४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## मंत्रालयात सातव्या मजल्यावर सिलिंग कोसळलं

मुंबई: मंत्रालयातून एक मोठी बातमी समोर येत आहे. ती म्हणजे आज सकाळी कामाच्या वेळेमध्ये मंत्रालयातील सातव्या मजल्यावरील सीलिंग अचानक कोसळलं. सुदैवाने कुठलीही जीवितहानी झालेली नाही. मात्र या घटनेमुळे सदर ठिकाणी काही वेळ गोंधळ निर्माण झाला होता.

मुळात, मंत्रालयात विविध कामांसाठी दररोज हजारो नागरिकांची वर्दळ असते. त्यामुळे मंत्रालयात अशाप्रकारे दुर्घटना होणे ही चिंतेचीच गोष्ट म्हणावी लागेल. सुदैवाने यात कुठलीही जिवीतहानी किंवा कोणी जखमी झालेलं नाही.













## खुलताबाद नगरपरिषद जि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर

ई-मेल- khultabadcome@gmal.com Telephone No : ०२४३७ २४१०७२

दुरध्वनी क्र. ०२४३७ २४१०७२ जा.क्र. २०२५/नपखु/कावि/१२६७ दिनांक. २५/०७/२०२५

### जाहीर सूचना

Single Use Plastic (SUP) Ban Notification

**एकल वापर (सिंगल यूज़) प्लास्टिकचा वापर बंद करणेबाबत.**

नगर परिषद खुलताबाद हद्दीतील सर्व दुकाने / संस्था / आस्थापना / मार्केट संघटना /कार्यालये व व्यक्तींना सूचित करण्यात येते की. केंद्र शासनाच्या पर्यावरण वन व हवामान परिवर्तन मंत्रालयाद्वारे प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ अधिसूचित करण्यात आले आहेत. त्यामधील प्रथम सुधारणा नियम दि.१२/०८/२०२१ अन्वये सन २०२२ पर्यंत एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिक वस्तूंना प्रतिबंधित करण्याकरिता ३० सप्टेंबर २०२१ पासून ७५ मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या सर्व प्रकारच्या प्लास्टिक साहित्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. सजावटीचे प्लास्टिक व पॉलीस्टीरीन (थर्मोकोल) सिगारेटची पाकिटे, प्लास्टिक काड्यासह कानकोरणी, फुग्यासाठी प्लास्टिकच्या काड्या व आईस्क्रीम काड्या, प्लेटस्, कप, चमचे, चाकू, स्ट्रॉ ग्लासेस प्लास्टिक किंवा पीव्हीसी बॅनर (१०० मायक्रोनपेक्षा कमी) याबरोबरच महाराष्ट्र प्लास्टिक व थर्मोकोल अधिसूचना २०१८ अंतर्गत खालील गोष्टी प्रतिबंधित आहेत. सर्व प्रकारच्या प्लॉस्टिक पिशव्या (कॅरी बॅग्स) हँडल असलेल्या व नसलेल्या डिश बाऊल, कंटेनर (डबे) करीता कोणीही शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिक साहित्याचा वापर, वाहतूक किंवा साठवणूक करू नये अन्यथा महाराष्ट्र प्लास्टिक व थर्मोकोल अधिसूचना २०१८ चे उल्लंघन केल्यास खालील प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल.

| अ.क्र | गुन्हयाचे स्वरुप | दंडाची रक्कम |
|---|---|---|
| १ | पहिला गुन्हा | रु.५०००/- |
| २ | दूसरा गुन्हा | रु.१००००/- |
| ३ | तिसरा गुन्हा | रु.२५०००/- व तीन महीने कारावास |

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद खुलताबाद

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# महिलांचे गांधी चौकात आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
शहरालागत असलेल्या आर्वी येथील एक महिला गांधी चौकात आमरण उपोषण करीत असून अद्याप पर्यंत कोणीच लक्ष दिले नाही.
युगन्धर सोसायटीतील खुल्या मैदानात प्रभू श्रीराम व हनुमानाचे मंदिर असून दर्शनासाठी गावकरी येत असतात. याच मंदिरासमोर राहत असलेली महिला शेहजादी शेख ही भक्तांना शिवीगाळ करते, अंगावर कचरा टाकते, जीवे मारण्याची धमकी देते, गोमासाचे टुकडे टाकते, भक्तांना गुंड बोलावून मारहाण करते,असा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे.

मंदिरात येण्यास मज्जाव करते. सदर महिले विरोधात पोलिसात अनेक गुन्हे दाखल आहेत. मात्र पोलीस प्रशासनाने या गंभीर प्रकरणावर कोणतीही कारवाई केली नाही.

सदर धर्मांध व गुंड प्रवृतीच्या महिलेसवर कायदेशीर चौकशी करून तडीपारीची कार्यवाही करावी अशी मागणी करीत राधिका पाटील व अन्य महिला आमरण उपोषण करीत आहेत. राधिका पाटील ह्या मंदिरात दर्शनासाठी गेल्या असताना त्यांच्यावर अश्लील शिवीगाळ करून जीवघेणा हल्ला करण्याच्या उद्देशाने चक्क अंगावर गाडी घालण्याचा प्रयत्न केला गेला मात्र तिच्यावर अद्यापही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. अनधिकृत कब्जा केलेला आहे. या गंभीर प्रकरणीची सविस्तर माहिती उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आली आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### शंकर महादेवन यांच्या आवाजात लवकरच येणार लातूरकरांचे भक्तिगीत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
लातूरच्या सुपुत्राने लिहिलेलं आणि संगीतबद्ध केलेलं एक भक्तिगीत गायन केलं आहे खुद्द बॉलिवूडचे सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांनी.
हे गाणं मुंबईतील वाशी येथे असलेल्या शंकर महादेवन यांच्या स्टुडिओमध्ये रेकॉर्ड करण्यात आले. या खास गाण्याच्या निर्मितीमागेही लातूरकरांचाच सहभाग आहे. या गाण्याचे निर्माते आहेत श्रीनिवास कुलकर्णी आणि अमोल घोडके, तर गीतकार आणि संगीतकार म्हणून शैलेश चंद्र लोखंडे यांनी हे भक्तिगीत साकारले आहे.
हे गाणं श्री गणेशजींवर आधारित एक भावपूर्ण भक्तिगीत असून, येत्या गणेशोत्सवात संपूर्ण महाराष्ट्रात आणि गणेशभक्तांच्या मनात स्थान मिळवणार आहे. शंकर महादेवन यांनी गायनानंतर प्रतिक्रिया देताना, लातूरच्या सांगीतिक क्षमतेचं आणि स्थानिक कलाकारांच्या मेहनतीचं मनापासून कौतुक केलं. हे भक्तिगीत लवकरच भेटीला येणार असून, भक्तीभावाने आणि सुरेल साजाने सजलेलं हे गीत गणेशभक्तांसाठी एक अद्वितीय भेट ठरणार आहे.

### एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालय विद्यार्थी सहाय्यता केंद्र घोषित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फ एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयास लातुर जिल्ह्याकरिता विद्यार्थी सहाय्यता केंद्र म्हणुन घोषित करण्यात आले. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनातर्फे परिपत्रक जारी करण्यात आले.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा अंतर्गत राज्यातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया संबंधी माहिती, मार्गदर्शन तसेच प्रक्रिये दरम्यान येणाऱ्या अडचणी सोडवण्याच्या अनुषंगाने विद्यार्थी व पालकांच्या हितास्तव 'विद्यार्थी सहाय्यता केंद्रा'ची सुविधा ह्या महाविद्यालयात उपलब्ध असणार आहे. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात अभियांत्रिकी पदविका, पदवी व पदव्युत्तर, बीसीए, एमसीए तसेच एमबीए हे अभ्यासक्रम चालवले जातात. ह्या व इतर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मोफत नोंदणी तसेच मार्गदर्शन केंद्रही महाविद्यालयात कार्यरत आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी या सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सौ ज्योती पाटील यांनी केले असुन आमच्या महाविद्यालयाच्या तज्ञ प्राध्यापकांची टीम याकरिता कायम तत्पर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### लोकमान्य टिळक विचार मंचच्या वतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या १६९ व्या जयंतीनिमित्त लोकमान्य टिळक विचार मंचच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

शहरातील लोकमान्य टिळक चौक येथे विचार मंचचे अध्यक्ष संजय निलेगावकर,संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब देशपांडे, सचिव प्रा. जयंत शास्त्री,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक प्रा. राजेश्वर बेंबडे,लक्ष्मीकांत कुलकर्णी यांच्यासह विचार मंचचे, शेषराव कुलकर्णी,संचालक ॲड.नरेंद्र कुलकर्णी, किरण कुलकर्णी,विवेक हाडगेकर, वसंतराव बेंडे,धनंजय बोरगावकर यांची उपस्थिती होती.

### खांबाच्या कठड्याला धडकून कारचालकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
शहराच्या छत्रपती संभाजी महाराज चौकातून जाणाऱ्या रस्त्याच्या शेजारील खांबाच्या पहाटेच्या सुमारास एका कारने धडक दिली. या अपघतात जखमी झालेल्या कारचालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.
दुर्गाप्रसाद कोटलवार असे मृत्यू पावलेल्या कारचालकाचे नाव आहे. मयत कोटलवार हे गुरुवारी पहाटे छत्रपती संभाजी महाराज चौकातून एलआयसी कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याने त्यांची कार घेऊन निघाले असताना विद्युत पथदिव्याच्या दगडी कठड्याला त्यांची कार जोरात धडकली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या कोटलवार यांना तत्काळ येथील हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. उपचारादरम्यान, गुरुवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

# विद्यार्थ्यांनी कारगिल युद्धाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घ्यावी

## कमांडिंग ऑफिसर कर्नल वाय. बी. सिंग यांनी कारगिल युद्धाचा उलगडला इतिहास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
आपल्या देशाला युद्धाच्या विजयाची यशस्वी परंपरा आहे. कारगिल युद्धामध्ये सुद्धा आपल्या देशातील सर्व जवानांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन विजय प्राप्त केला त्यामुळे महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट्सनी या युद्धाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्र बटालियन एनसीसी, कमांडिंग ऑफिसर कर्नल वाय. बी. सिंग यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील एनसीसी विभाग व ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने कारगिल युद्ध या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते. तर विचारमंचावर दयानंद सायन्स कॉलेजचे एनसीसी विभाग प्रमुख कॅप्टन विजेंद्र चौधरी आणि महाविद्यालयातील एनसीसी विभागाचे प्रमुख डॉ. सुजित हांडीबाग यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे बोलताना कमांडिंग ऑफिसर कर्नल वाय. बी. सिंग म्हणाले की, कारगिल युद्ध हे अत्यंत खडतर पद्धतीने आपण जिंकलो आहोत.



यामध्ये अनेक जवानांनी आपले बलिदान दिले आहे त्यामुळे त्यांच्या बलिदानाची आज आपण आठवण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य असल्याचे सांगून त्यांनी पीपीटीच्या माध्यमातून सर्व कारगिल युद्धाचा ऐतिहासिक उलगडा केला आणि चर्चात्मक स्वरूपामध्ये सर्वांना माहिती दिली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, आज भारतीय व्यक्ती हा अत्यंत आनंदाने जीवन जगतो आहे कारण आपल्या संरक्षण आणि सुरक्षितेची जबाबदारी ही आपल्या देशातील जवानांकडे आहे आणि ते आपल्या देशाचे रात्रंदिवस परराष्ट्रीय आक्रमणापासून संरक्षण करण्याचे राष्ट्रीय कार्य करीत आहे त्याबद्दल आपण त्यांच्या प्रती स्वाभिमानाची भावना ठेवली पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी दयानंद कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज, शाहू कॉलेज व देशी केंद्र विद्यालयामधील कॅडेट उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस कर्नल वाय बी सी व महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे आगमन झाल्यानंतर कॅडेट रामलिंग कोल्हापुरे व कॅडेट साईराज शेळके यांनी उत्कृष्ट पायलेटिंग करून त्यांना आदराने विचारमंचावर आणले.

### विजय घाडगे पुण्यात ॲडमिट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
'छावा' संघटनेचे विजयकुमार घाडगे-पाटील हे जखमी अवस्थेतच रुग्णवाहिकेतून उपमुख्यमंत्री पवार यांना भेटण्यासाठी जात असताना पुण्याजवळ पोहोचल्यानंतर त्यांना श्वसनाचा त्रास वाढल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तेथे त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. करण्यात येत आहेत.
घाडगे यांना राष्ट्रवादीच्या सूरज चव्हाणसह कार्यकर्त्यांनी मारहाण केली. कृषी मंत्री कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे निवेदन घेऊन ते राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांना देण्यासाठी निघाले होते. होते. त्यावेळी झालेल्या मारहाणीत जखमी झालेले घाडगे हे उपमुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी मुंबईकडे निघाले होते.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार रमेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर तालुक्यातील मौजे निवळी आणि भोईसमुद्रगा तसेच भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथील रक्तदान शिबिरास मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांसह अनेकांनी रक्तदानात सहभाग नोंदवला.

लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथील रक्तदान शिबिरात ४९ जणांनी रक्तदान केले या रक्तदान शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ कार्यकर्ते विश्वनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, किशोर सुडके, अभयकुमार सोनपेठकर, काशिनाथ ढगे, युवराज सुरवसे, स्वप्निल काळे, लहूराजे सवाशे, डॉ. पलंगे, लक्ष्मण सगर, उद्धव रसाळ, सचिन सवयी, धनंजय देशमुख, किशोर गुट्टे, मारुती माने, महेश शिंदे, विकास शिंदे, भरत शिंदे, रोहित शिंदे, गजानन ढोपळे, अरविंद पारवे, गौतम राऊत, अल्ताफ तांबोळी, मंगेश शिंदे, शिवराम शिंदे, श्रीकांत घाडगे, दत्ता खुडे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते नागरिक रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर तालुक्यातील मौजे भोईसमुद्रगा येथील रक्तदान शिबिरात ५५ जणांनी रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या यावेळी मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, माजी अध्यक्ष बन्सी भिसे, किरण रोंगे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते नागरिक रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे समदर्गा येथे आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ३८ जणांनी रक्तदान केले यावेळी मंडळाचे अध्यक्ष उद्धव काळे, पद्माकर चिंचोलकर आदी उपस्थित होते.

# शासकीय कामात अडथळा; चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
तालुक्यातील नांदुरा (बु.) येथील स्मशानभूमीच्या जागेची मोजणी सुरू असताना शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील नांदुरा (बु.) येथील स्मशानभूमीच्या जागेच्या हद्दीवरून काही दिवसांपासून वाद सुरू होता. यावर तोडगा काढण्यासाठी महसूल विभागामार्फत जागेची अधिकृत मोजणी करण्यात आली. मोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंत्यसंस्कारासाठी योग्य जागा निश्चित करून ती २१ जुलै रोजी जेसीबीच्या सहायाने समतल करण्याचे काम सुरू होते. यावेळी चौघांनी घटनास्थळी येऊन जेसीबीसमोर उभे राहत काम थांबवण्याचा प्रयत्न केला, शासकीय कर्मचाऱ्यांशी हुज्जत घालून कामात अडथळा निर्माण केला. यामुळे काही काळ वातावरण तणावपूर्ण बनले होते. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. अहमदपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी बुधवारी विशाल बाबूराव केंचे यांच्या फिर्यादीवरुन चंद्रकांत पंढरीनाथ मद्दे, प्रकाश भागवत नागमोडे, रामचंद्र संभाजी बडगिरे, गोपाळ विश्वनाथ बडगिरे यांच्याविरुध्द शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शून्य रक्कमेत जनधन खाते

## अन् विमा योजनांची होणार जागृती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
जिल्हा प्रशासन आणि जिल्हा अग्रणी बँकेच्या वतीने केंद्र सरकारची आर्थिक समावेशकता मोहिम जिल्ह्यात ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येत आहे. या मोहिमेत शून्य रक्कमेवर जनधन खाते उघडण्यासह केंद्र सरकारच्या बँकांमार्फेत राबवण्यात येणाऱ्या विमा व पेन्शन आदी सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ ग्राहकांना देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक राहुल आठवले यांनी दिली.

ही मोहिम केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर - घुगे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. मोहिमेचा मुख्य उद्देश जनसुरक्षा योजनांद्वारे लाभार्थींना सुरक्षित करणे हा आहे. मोहिमेत शून्य बॅलेन्स जन धन खाते उघडणे, प्रधानमंत्री सुरक्षा विमा व प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेत नोंदणी करणे, अटल पेन्शन योजनेचे सदस्यत्व देणे तसेच दहा किंवा त्याहून अधिक वर्षापूर्वी उघडलेल्या बचत वा जन धन खात्यांसाठी तसेच निष्क्रिय खात्यांसाठी रि- केवायसी करणे आदी महत्त्वपूर्ण सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. मोहिमेत डिजिटल फसवणुकीपासून स्वतःचे रक्षण कसे करावे व भारतीय रिझर्व बँकेच्या (आरबीआय) दावा न केलेल्या ठेवीमध्ये हस्तांतरित केलेल्या पैशाचा दावा कसा करावा, याची सर्व माहिती दिली जात आहे. जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका तसेच ग्रामीण बँका या मोहिमेत सक्रिय सहभाग आहे.

जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायती, बँक शाखा तसेच ग्राहक सेवा केंद्रांकडून त्यांना नेमून दिलेल्या गावांमध्ये मोहिमेत शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# 'छावा'चे घाडगे यांच्यावर हल्ला करणाऱ्यावर मकोका लावण्यात यावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गेल्या अनेक वर्षापासून काम करणारे छावा संघटनेचे युवा प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांनी राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निवेदन देण्यासाठी गेले असताना राष्ट्रवादी युवाचे प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण व इतर तीस चाळीस युवकांच्या टोळक्याने घाडगे पाटील यांच्यावर जीवघेणा हल्ला करून अमानुषपणे मारहाण केली.

त्यामुळे छावाचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा शेतकरी नेते विजयकुमार घाडगे पाटील यांच्या हल्ला करणाऱ्यावर मकोका लावण्यात यावा. अशी मागणी जननायक संघटनेचे लातूर तालुकाध्यक्ष निळकंठराव पवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

छावाचे विजयकुमार घाडगे यांनी राष्ट्रवादी अजितदादा गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांना दिलेले हे निवेदन लोकशाही मार्गाने होते, हे काही चकीचे नाही,तरीही छावाचे विजयकुमार घाडगे यांच्यावर राष्ट्रवादी युवाचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण व त्यांच्या साथीदारांनी शासकीय विश्रामगृहावर फायटर, लोखंडी कडे याचा वापर करून तसेच घाडगे यांच्या मानेवर जबर मारहाण केली. या प्रकरणी विवेकानंद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातील मुख्य आरोपीवर ३०७ व मकोका लावण्यात यावा. अशा मागणीचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व जिल्हा पोलीस अधिक्षकाकडे देण्यात आलेले आहे. अशा या घटनेमुळे उत्तर प्रदेश व बिहार पेक्षाही गुंडगिरीत महाराष्ट्र पुढे गेलेला आहे की काय असे या घटनेवरून दिसून येत आहे.

त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करून छावाचे विजयकुमार घाडगे यांना योग्य तो न्याय देण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी या निवेदनाद्वारे केली.

# सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल देशमुख यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कै.बाळासाहेब घुईखेडकर यांच्या नावाने दिला जाणारा राज्य स्तरीय उदयोन्मुख तरूण सहकारी कार्यकर्ता - २०२४ हा पुरस्कार जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष , माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांना देण्यात आला आहे.

राज्याचे सहकार राज्य मंत्री ना.डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले धिरज विलासराव देशमुख यांच्या वतीने जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव यांनी पुरस्कार स्विकारला



लोकनेते विलासराव देशमुख साहेब व बँकेचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी लातूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्राला बळकटी देवून योग्य दिशा दाखवली त्यामुळे देशभरात मांजरा परिवारातील साखर कारखाने,जिल्हा बँक व अन्य सहकारी संस्थांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.

लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचा अध्यक्ष म्हणून काम करत असताना शेतकरी, सभासदांच्या हिताला डोळ्यासमोर ठेवून धिरज विलासराव देशमुख यांनी पुर्वीच्या व नव्याने अनेक योजनांचा लाभ संबंधितांना मिळवून देत असताना जिल्हा बँकेचा गौरव वाढवला.


शेतक-याची गरज लक्षात घेऊन बिन व्याजी कर्ज योजनेतील मर्यादा ३ लाखां वरून ५ लाखां पर्यंत केली, पिक कर्ज योजनेच्या माध्यमातून १७८० कोटी ऐवढे ऐतिहासिक कर्ज शेतकरी सभासदांना वाटप केले, लोकनेते विलासराव देशमुख व्याज सवलत योजनेच्या माध्यमातून ८४२८३ शेतकऱ्यांना लाभापोटी बँकेने स्वनिधीतून संबंधित शेतक-यांना १२.१६ कोटी अदा केले, ऊस तोडणी यंत्र खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देवून अनेक तरुण शेतक-यांना स्वतः चा व्यवसाय सुरू करण्यासाठी मदत केली, कृषी यांत्रिकी करणास चालना देत असताना ट्रॅक्टर कर्ज योजनेत सुलभता आणली, महीला बचत गटांना कर्ज मर्यादा २ वरून ५ लाख केली, रेशीम शेतीसाठी शुन्य टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देत असताना कर्ज मर्यादा २ लाखा वरून ५ लाख केली, ब्रॅच ऑन व्हील द्वारे शेतक-यांना गावपातळीवर बँकींग सेवा पुरवली, मागील सलग तीन वर्षांपासून जिल्हा बँकेस १०० कोटी पेक्षा अधिक ढोबळ नफा प्राप्त करून दिला, आर्थिक वर्ष २०२४/२५ मध्ये निव्वळ नफा ७३.१५ कोटी, जिल्हा बँकेच्या सभासद खातेदारांना मोबाईल बँकिंग ॲप, युपीआय अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या. या सर्व कार्याची दखल घेवून लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेस पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

# परिचारीकांच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२५ जुलै -**
रुग्णालय आणि रुग्ण यांच्या मधला दुवा म्हणून काम करणाऱ्या परिचारीका अतिशय महत्वाच्या आहेत. रुग्णांना आजारातून मुक्त करण्यासाठी त्यांची सेवाही तितकीच मोलाची आहे. मात्र परीचारीकांच्या काही मागण्या असून त्या सोडविण्यासाठी त्यांना आंदोलन करावे लागते ही खेदाची बाब आहे. त्यांच्या मागण्या सोडविण्यासाठी किंवा पुर्ण करण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू अशी ग्वाही भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी परिचारीका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करताना दिली.

महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटनेच्या वतीने गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या मागण्या पुर्ण करण्यासाठी संपुर्ण राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. लातूर जिल्ह्यातील परिचारीका या आंदोलनात सहभागी झालेल्या आहेत. या आंदोलनाची माहिती मिळताच भाजपा शहर जिल्हाध्यक्ष



अजित पाटील कव्हेकर यांनी आंदोलनस्थळी जाऊन त्यांच्या मागण्या ऐकून घेत त्यांच्याशी चर्चा केली.

रुग्णालयाच्या कामकाजात परिचारीकांची भुमिका अतिशय महत्वाची असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर यांनी परिचारीका खऱ्या अर्थाने रुग्णालयाचा कणा आहेत. त्यामुळेच आरोग्य सेवा देताना त्यांनी केलेले काम रुग्णालयासाठी महत्वाचे ठरत असते. रुग्णांना आजारातून मुक्त करण्यासह त्यांना मानसिक आधार देण्यातही परिचारीकांचा मोलाचा वाटा असतो असे सांगून अजित पाटील कव्हेकर यांनी परिचारीका संघटनेच्या वतीने जे आंदोलन होत आहे ते आंदोलन रुग्णसेवेत बाधा ठरू नये अशी अपेक्षा व्यक्त केली. परिचारीकांच्या ज्या मागण्या आहेत त्या मागण्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत याबाबत खेद व्यक्त केला. संघटनेच्या वतीने ज्या मागण्या केलेल्या आहेत त्या मागण्या तात्काळ शासन दरबारी पोहचवल्या जातील आणि त्या सोडविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मंत्री महोदयांसोबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यासाठी पाठपुरावा करू अशी ग्वाही अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी दिली.

यावेळी आंदोलनस्थळी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूरच्या अध्यक्षा श्रीमती छाया चव्हाण, राज्य खजिनदार राम सुर्यवंशी, उपाध्यक्षा रेणुका पाटील, संजीव लहाने, सचिव भाग्यश्री जोगदंड आदी उपस्थित होते.

## दोन चाकं, एक उद्दिष्ट: बीडमध्ये रस्ता सुरक्षेला प्राधान्य

बीड - देशभर राबवण्यात येणाऱ्या रोड सेफ्टी मोहिमेचा एक भाग म्हणून होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया ने बीडमधील पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि सेंट ॲन्स स्कूल मध्ये रोड सेफ्टी जागरूकता कार्यक्रम घेतला. या उपक्रमातून २३०० हून अधिक विद्यार्थ्यांना जबाबदार आणि जागरूक रोड यूजर्स बनण्याची प्रेरणा मिळाली.सध्या मोबिलिटी क्षेत्र झपाट्याने बदलत आहे आणि देशभरात दुचाकींचा वापर मोठ्या प्रमाणात वाढतोय. त्यामुळे रोड सेफ्टी शिक्षणाची गरज पूर्वीपेक्षा खूपच वाढली आहे. याच उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेमुळे शालेय वर्गखोल्या काही काळासाठी रोड सेफ्टी शिकवण्याचं प्रभावी व्यासपीठ बनल्या आणि विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध वाहतुकीचे प्राथमिक नियम समजून घेण्याची संधी मिळाली.सहभागी विद्यार्थ्यांना विविध माहितीपूर्ण सत्रांद्वारे मार्गदर्शन केले. यामध्ये रस्ते सुरक्षेवरील नियोजित सैद्धांतिक माहिती, संवादात्मक चर्चासत्रे आणि सुरक्षित ड्रायव्हिंग सवयींचा परिणाम दर्शविणारी स्थिर प्रात्यक्षिके समाविष्ट होती. हेल्मेट वापर, परिस्थितीजन्य जागरूकता आणि रस्त्याच्या परिस्थितीत योग्य निर्णय घेणे यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला. सत्रांनी सहभागींच्या विचार कौशल्यांना चालना दिली आणि त्यांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहन दिले. या सत्रांचा उद्देश केवळ माहिती देणे नव्हे तर प्रत्येक व्यक्तीमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करणे हा होता.

## 'बेबी जॉन' झी सिनेमा वर

मुंबई : झी सिनेमावर २७ जुलै रोजी रात्री ८ वाजता होणाऱ्या 'बेबी जॉन' च्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअरसाठी तयार व्हा - कारण वरुण धवन आपल्या खास स्टाईलमध्ये, कॉमेडी, स्वॅग आणि जबरदस्त ॲक्शनसह पुन्हा एकदा तुमच्या टीव्ही स्क्रीनवर येतोय! कालीस दिग्दर्शित आणि झी स्टुडिओ, ॲटली, ए फॉर ॲपल स्टुडिओज आणि सिने १ प्रॉडक्शन प्रस्तुत हा चित्रपट - 'बेबी जॉन' - एक जबरदस्त ॲक्शन थ्रिलर आहे जो देशभरातल्या प्रेक्षकांचे भरघोस मनोरंजन करणार आहे. खळखळून हसवणारे क्षण, एका वडिलांचे आपल्या मुलीशी असलेले हळवे नाते आणि जोरदार ॲक्शन - हे सगळे 'बेबी जॉन' मध्ये पाहायला मिळणार आहे.

## वारीदरम्यान वारकऱ्यांना दिला संरक्षणाचा विश्वास

छत्रपती संभाजीनगर- केअर आणि कनेक्शनची भावना व्यक्त करत, पिडिलाईट इंडस्ट्रीज लिमिटेडचा प्रमुख वॉटरप्रूफिंग ब्रँड डॉ. फिक्सिटने महाराष्ट्राच्या श्रद्धेने भरलेल्या पंढरपूर वारीदरम्यान खास डिझाइन केलेल्या वॉकिंग रूफ्स आणि मोबाईल शेल्टर्स (चल निवाऱ्यांची) सुविधा पुरवली. दरवर्षी लाखो भाविक सहभागी होणाऱ्या या आध्यात्मिक यात्रेत यंदा हजारो वारकऱ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला. या उपक्रमाद्वारे संरक्षणाच्या वचनाशी बांधिलकी दाखवत डॉ. फिक्सिटने या प्रदेशाच्या सांस्कृतिक रचनेशी आपली नाळ घट्ट केली आहे. ही एक प्रेरणादायी कृती असून, या आध्यात्मिक प्रवासात डॉ. फिक्सिट एक विश्वासार्ह साथीदार म्हणून पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे. जसे नावावरूनच स्पष्ट होते, वॉकिंग रूफ्स हे छत्रछाया देणारे संरक्षक होते जे वारकऱ्यांसोबत चालत राहिले, पावसापासून त्यांना संरक्षण देत आणि त्यांच्या पवित्र पदयात्रेला कोणतीही अडथळा येऊ न देता सुरळीत पार पडण्यास मदत केली. याशिवाय, डॉ. फिक्सिटने मार्गातील विविध टप्प्यांवर मोबाईल शेल्टर्स (चल निवारे) उपलब्ध करून दिले, जेणेकरून वारकऱ्यांना विश्रांती घ्यायला आणि ऊर्जा पुनर्संचयित करायला मदत मिळाली. या विचारपूर्वक घेतलेल्या पुढाकाराच्या माध्यमातून, डॉ. फिक्सिटने 'संरक्षण' या आपल्या वचनाला वारीचा अविभाज्य भाग बनवत, महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील सांस्कृतिक व भावनिक नात्याशी स्वतःला अधिक घट्टपणे जोडलं आहे.

## मुंबईत यूपीआयटीएस २०२५ रोड शो आयोजित

मुंबई, २५ जुलै २०२५ - उत्तर प्रदेशच्या गतिमान एमएसएमई आणि निर्यात परिसंस्थेत व्यावसायिक संबंध मजबूत करण्यासाठी आणि गुंतवणूकीला चालना देण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल म्हणून, उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शन (यूपीआयटीएस २०२५) महाराष्ट्रात त्याच्या प्रचाराच्या चौथ्या टप्प्यासाठी आयोजित केले जात आहे. उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार शो (यूपीआयटीएस २०२५) च्या तिसऱ्या आवृत्तीचा रोड शो भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील चर्चगेट येथील वालचंद हिराचंद हॉल, आयएमसी बिल्डिंग येथे आयोजित करण्यात आला होता.मुंबई रोड शोचे अध्यक्षस्थान उत्तर प्रदेश सरकारचे माननीय एमएसएमई, खादी आणि ग्रामोद्योग, रेशीम शेती, हातमाग आणि वस्त्रोद्योग मंत्री श्री राकेश सचान यांनी भूषवले होते, जे प्रमुख पाहुणे होते. या प्रसंगी उत्तर प्रदेश सरकारचे उद्योग आयुक्त श्री व्ही. पांडियन, आयएएस; श्री दीपेंद्र सिंह कुशवाह, आयएएस, विकास आयुक्त (उद्योग), महाराष्ट्र शासन; डॉ. नीरज खन्ना, अध्यक्ष, ईपीसीएच; श्री ललित गांधी, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर; श्री. जयप्रकाश भाटिया, अध्यक्ष, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया - मुंबई सेंटर; आणि इतर मान्यवर. समारंभाला संबोधित करताना श्री राकेश सचान म्हणाले की, व्यापार मेळाव्यापेक्षाही अधिक, यूपीआयटीएस हा उत्तर प्रदेशच्या उद्योजकीय उत्कृष्टतेचा उत्सव आहे, जो परंपरांमध्ये खोलवर रुजलेला आहे परंतु जागतिक महत्त्वाकांक्षेकडे वाटचाल करत आहे.

## पेल्व्हिक, लिम्ब आणि स्पाइन सर्जरीनंतर जीवनदान

अहमदनगर : निवासी इमारतीच्या पाचव्या मजल्यावरून पडलेल्या व गंभीर दुखापतींसह बेशुद्ध अवस्थेत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलेल्या एका १३ वर्षीय मुलाचे प्राण वाचविण्यात खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांना यश आले. मुलाच्या शरीराच्या संपूर्ण डाव्या बाजूला गंभीर मार लागला होता, यात मांडीचे हाड (फेमर), हात, पाऊल आणि पेल्व्हिसला झालेले फ्रॅक्चर, अंतर्गत रक्तस्त्राव आणि मणक्याला झालेल्या दुखापतीचा समावेश होता. हॉस्पिटलमध्ये दाखल करतेवेळी त्याचा रक्तदाब ५०ााहस इतका होता तर हिमोग्लोबीनची पातळी अत्यंत खाली म्हणजे ५स/वङ वर पोहोचली होती. अंतर्गत रक्तस्त्रावामुळे आणि प्लेटलेट्सची संख्या कमी झाल्याने मुलाची स्थिती प्रचंड खालावली होती. त्याच्या हाताचे व मांडीचे फ्रॅक्चर बसविण्यासाठी दुपारी १२ वाजल्यापासून ते दुपारी तीन वाजेपर्यंत तीन तास इमर्जन्सी शस्त्रक्रिया करण्यात आली.

## रियलमी चे रियलमी १५ प्रो ५जी आणि रियलमी १५ ५ जी बाजारात दाखल

छत्रपती संभाजीनगर २५ जुलै २०२५: भारतातील युवकांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय असलेला स्मार्टफोन ब्रँड रियलमी ने आज रियलमी १५ प्रो ५जी आणि रियलमी १५ ५ जी हे नवीन स्मार्टफोन्स सादर केले आहेत. 'एआय पार्टी फोन' म्हणून ओळखले जाणारे हे दोन्ही मॉडेल्स कॅमेरा गुणवत्ता, प्रगत एआय आणि एकूणच कार्यक्षमतेसाठी नवे मापदंड निर्माण करतात. विविध जीवनशैलीचा स्वीकार करणाऱ्या तरुण पिढीला लक्षात घेऊन डिझाइन केलेल्या रियलमी १५ सिरीज मध्ये ट्रिपल ५०एमपी अल्ट्रा-क्लिअर कॅमेरे आणि ४के ६० एफपीएस व्हिडिओ रेकॉर्डिंगची सुविधा आहे, ज्यामुळे कोणत्याही कोनातून, कोणत्याही क्षणी स्पष्ट आणि जिवंत चित्रण करता येते. याशिवाय, ही सिरीज एआय इमेजिंगच्या क्षेत्रात क्रांती घडवते, कारण यामध्ये जगातील पहिले एआय एडिट जिनी तंत्रज्ञान आणि विशेषतः तरुण वापरकर्त्यांसाठी तयार केलेला एआय पार्टी मोड समाविष्ट आहे.



## गयाबाई घुगे यांचे निधन

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.२२ जुलै - तालुक्यातील मेहेगाव येथील ह.मु. हिवरखेडा रोड कन्नड येथील गयाबाई केशवराव घुगे वय ८५ वर्ष यांचे वृद्धापकाळाने दि २५ रोजी दुपारी निधन झाले.त्यांचा अंत्यविधी दि २६ रोजी सकाळी ९ वाजता कन्नड येथील देवलोक स्मशानभूमीत करण्यात येणार आहे .त्यांचा पश्चात पती , दोन मुले , सुना , नातवंडे असा परिवार आहे.त्या सामाजिक कार्यकर्ते श्रीराम घुगे यांच्या आई होत

# जिल्ह्याच्या काही भागात २५ व २६ जुलैं रोजी पावसाचा हवामान खात्याचा अंदाज

### नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

अहिल्यानगर, दि. २५- जिल्ह्याच्या काही भागात दि. २५ जुलै २०२५ रोजी विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता असून दि. २६ जुलै २०२५ रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यात मध्यम स्वरुपाचे व मुसळधार पर्जन्यमान झाल्यास जिल्ह्यातून वाहणाऱ्या भीमा, प्रवरा, गोदावरी, सीना तसेच हंगा या नदीकाठावरील तसेच मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील कोतुळ येथून मुळा नदीपात्रामध्ये विसर्ग सुरु असल्याने नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज्) कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी (डशश्रषळश) काढू नये. वादळी वारा, पाऊस व गारपीट यामुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे.

शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.



खुलताबाद शहरासह तालुक्यात भरात शुक्रवारी सुरु झालेल्या मुसळधार पावसामुळे जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथील सीता न्हाणी धबधबा ओसंडून वाहू लागला आहे.

### अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई

# १९७ बसेसवर कारवाईतून १६.५७ लाखांची दंड वसूल

अहिल्यानगर, दि. २५ - अवैधरीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने २३ व २४ जुलै दरम्यान विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान १९७ अवैध वाहतूक करणाऱ्या बसेसवर मोटार वाहन कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करून १६ लाख ५७ हजार २५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली.

वैध विमा नसलेली वाहने, कर न भरलेली वाहने, विधीग्राह्य परवाना नसलेली वाहने, आसन क्षमतेचे उल्लंघन करणारी वाहने, चालकाची अनुज्ञप्ती नसणे, वाहन नोंदणी पुस्तिकेप्रमाणे न ठेवता बदल करण्यात आलेली वाहने, इंडिकेटर्स, लाईट, परवर्तक दिशादर्शक नसलेली वाहने, वायु प्रदुषण निवारक तरतूदीचा भंग, प्रवासी वाहनातून मालाची वाहतूक, बेकायदा प्रवासी वाहतूक, योग्यता प्रमाणपत्र विधीग्राह्य नसलेल्या वाहनांवर पथकाने कारवाई केली आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विशेष पथके व सात तालुका पथकांमधील कार्यरत मोटार वाहन निरीक्षक - श्रीमती गीता शेजवळ, सुरज उबाळे, कल्पेश सूर्यवंशी, चेतन दासनूर, सुदर्शन देवढे, हनुमंत पारधी, हर्षल जगताप, विलास धूम, सोनाली शिरसाठ, प्राजक्ता खोमणे यांनी कारवाईत सहभाग घेतला. मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार वाहन व परवान्याबाबत देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे, तसेच प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षित वाहतूक करावी, असे आवाहन श्री. सगरे यांनी केले आहे.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबाना आ. संजना जाधवांच्या अध्यक्षतेखाली धनादेश वाटप

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.२५ जुलै - तालुक्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबाना शासनाच्या अनुदानाचे धनादेश दि.२५ जुलै रोजी शासकिय विश्रामगृहात वाटप करण्यात आले

गोपीनाथ मुंढे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान १० कुटूंबाना, महसूल विभाग अंतर्गत शेतकरी आत्महत्या प्रकरणातील ०२ कुटूंबाना तर पशुधन मृत्यू प्रकरणातील १३ पात्र शेतकरी कुटुंबियांना शासनाच्या वतीने २५ कुटूंबाना आर्थिक मदतीचे धनादेश आमदार संजना जाधव अध्यक्षतेखाली वाटप करण्यात आले.



यावेळी गरजूंना वेळेवर आणि थेट मदत पोहोचवण्याचा शासनाचा हेतू अधोरेखित झाला. संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी ही आर्थिक मदत दिलासा देणारी असून त्यांच्या पुनर्वसनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन सदैव उभे आहे, हेच या उपक्रमातून एकदा स्पष्ट झाले. यावेळी तहसीलदार विद्याचरण कडवकर, कृषी अधिकारी संदीप शिरसाठ शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना सह रामेश्वर घनकर, दत्ता सोनवणे,आदित्य गर्जे जितू भेंडाळे, बाबुराव बनकर, माजी नगरसेवक कैलास जाध, नितीन सुसलादे, विकास वाघ, अमर पाटील, रितेश जाधव, सौरभ मोहिते, तात्याराव बारगळ,राजवर्धन जाधव, ऋषिकेश जाधव, शिवसेना प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# देवाचे वस्त्र बनवण्याच्या स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम शनिवार दिनांक २६ जुलैला संपन्न होणार

छत्रपती संभाजीनगर -

विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयाम महिला विभागातर्फे घोषित केलेल्या देवाचे वस्त्र बनवण्याच्या स्पर्धेचा बक्षीस वितरणाचा कार्यक्रम शनिवार दिनांक २६ जुलै २०२५ रोजी दुपारी ४ वाजता भक्ती गणेश मंदिर एन १ सिडको येथे संपन्न होणार असून या समारंभाला अध्यक्ष म्हणून आय.एम.ए.च्या जॉईंट सेक्रेटरी डॉक्टर सो उज्वलाताई दहिफळे प्रमुख अतिथी म्हणून जे जे प्लस हॉस्पिटलच्या संचालिका सुनिताताई राजपूत आणि त्याचबरोबर या कार्यक्रमात माननीय सौ कुंदाताई अंदुरे उपाध्यक्ष विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या बक्षीस वितरण कार्यक्रमात सर्वांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहावे असे आवाहन मंदिर अर्चक पुरोहित आयामाच्या प्रांत महिला विश्वस्त प्रमुख सौ राजश्री भिते आणि संभाजीनगर जिल्हा प्रमुख सौ अनुराधा पुराणिक यांनी केले आहे

# लायन्स क्लब मिडटाउन एनएक्सतर्फे विद्यार्थ्यांना संगणक भेट

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - लायन्स क्लब मिडटाउन एनएक्स २०२४-२५ (यंग लायन्स) तर्फे शासकीय तांत्रिक संस्था व औद्योगिक विद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे डिजिटल सशक्तीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत संगणक दान समारंभाचे आयोजन उत्साहात पार पडले. या उपक्रमाचा उद्देश वंचित विद्यार्थ्यांना संगणक सुविधा उपलब्ध करून देणे व पुढील पाच वर्षांसाठी देखभाल व तांत्रिक सहाय्य प्रदान करणे हा होता.



प्रमुख उपस्थितांमध्ये उपसंचालक व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण रविशंकर सावले व अजीत शिंदे, व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर १ राहुल अवसेकर, लायन्स क्लब मिडटाउनच्या अध्यक्षा सुनीता देसरडा, क्षेत्रीय चेअरपर्सन संजयजी सारडा व सरिता सारडा, तसेच लायन्स क्लब मिडटाउन एनएक्सचे अध्यक्ष एमजेएफ अक्षय सारडा, सचिव अक्षय अग्रवाल, कोषाध्यक्ष प्रतीक अग्रवाल, आगामी अध्यक्ष विपुल शर्मा, आगामी कोषाध्यक्ष अजिंक्य सिकची यांचा सहभाग होता. दानकर्ते म्हणून उपस्थित अंकित काले व निधी काले, निलेश अग्रवाल व स्नेहा अग्रवाल, उत्सव बहेती व सोहम बहेती, रौनक रूनवाल व सौम्या रूनवाल, प्रतीक अग्रवाल व प्रिया अग्रवाल, सीए पायल सारडा, काजोल अग्रवाल आणि प्रवे टायल यांनी या उपक्रमात मोलाचा वाटा उचलला. संस्थेचे प्राचार्य एन.एन. सर्जे यांच्या स्वागत भाषणानंतर मान्यवरांचे प्रेरणादायी उद्बोधने झाली, तर राहुल अवसेकर यांनी युवा स्वयंसेवकांना गौरवपदक प्रदान केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कुलकर्णी व सीए पायल सारडा यांनी तर आभार प्रदर्शन संतोष वाघपुर्णे व अक्षय अग्रवाल यांनी केले. समारोपानंतर हलक्या जलपानाच्या निमित्ताने संवाद साधण्यात आला. हा उपक्रम म्हणजे केवळ संगणक दान न राहता, तो आशा, संधी आणि सशक्तीकरणाचा एक मूर्त उदाहरण ठरला.

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२७/२०२५

१/- बाळकृष्ण नामदेव महानोर, वय ५९ वर्ष, धंदा शेती, रा. पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,

विरूद्ध

निल

प्रकरण: वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत नामदेव धोंडू महानोर यांचा दि. ०३/०८/२०२३व सुलोचना नामदेव महानोर यांचा दिनांक १०/०९/२०२१ दोघाचा मौजे पळसखेडा, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ हे वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार है मयत नामदेव धोंडू महानोर व सुलोचना नामदेव महानोर यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल, आजरोजी दि. २५/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २२/०९/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२४ /२०२५

१/- शांताराम पंढरीनाथ उर्फ पंढरी देसाई, वय ७४ वर्ष, धंदा शेती, रा. दत्त मंदिर गल्ली, नारळी बाग, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, २/- राजेंद्र पंढरी देसाई, वय ६५ वर्षी, धंदा, शेती, रा. वरीलप्रमाणे. ३/- दत्तात्रय पंढरी देसाई, वय ४० वर्षे, रा. राम मंदिर गल्ली, नारली बाग, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. ४/- विमलबाई ऑकार देसाई, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वाल्मिक नगर, सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.

विरूद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सयाबाई पंढरी देसाई यांचा दि. २७/०१/२००४ मौजे सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ है वारस आहेत असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत सयाबाई पंढरी देसाई यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल, आजरोजी दि. २५/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता. २६/०९/२०२५

आदेशावरुन

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २१३/२०२५.

१. भिमराव शामराव शेळके, वय ७० वर्षे, रा. सावळदाबारा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

१. रामा शामराव शेळके (मयत) अ) इंदुबाई रामा शेळके, वय ५५ वर्षे, रा. सावळदबारा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ब) राहुल रामा शेळके, वय २५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. क) ज्योती गजानन बेटोटे, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. सागवन, ता. जि. बुलढाणा. २. विठ्ठल शामराव शेळके (मयत) अ) बेबाबाई विठ्ठल शेळके, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. सावळदबारा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ब) विजय विठ्ठल शेळके, वय २४ वर्षे, धंदा मजुरी, रा. सावळदबारा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर ३. पंढरी शामराव शेळके, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ४. कमलबाई राजु करपे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. रिधोरा ख. ता. मोताळा, जि. बुलढाणा

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुभाबाई सुमनबाई शामराव शेळके यांचा दिनांक २७-०६-२०२३ रोजी सावळदबारा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार व गैरअर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत सुभाबाई सुमनबाई शामराव शेळके यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २२/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १४/०८/२०२५

आदेशावरुन,

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

जा.क्र. JTCCBC/३९८४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड,
छत्रपती संभाजीनगर- ४३१००१.
दि. १७/७/२०२५

## जाहीर नोटीस

मा. श्री. रा.स. पावसकर, धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात न्यासाचे नाव : श्री मरोती मंदिर व गिरीजा देवी, भडजी मु. भडजी, पो. गोळेगाव, ता., खुलताबाद जि. औरंगाबाद या न्यासास न्यासाचा कारभार पाहण्यासाठी विश्वस्त नेमणेबाबत प्रस्ताव अर्ज क्र. ०२/२०२५ कलम- ४७ नो. क्र. ए-९४५ (औ.) मध्ये जाहिर प्रगटन

अर्जदार - श्री. अप्पाराव लहानु वाकळे व इतर १३

विरुध्द

गैरअर्जदार - श्री. उत्तमपुरी प्रल्हाद पुरी व इतर ६

सदरील प्रस्ताव हा मा. धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर कार्यालय येथे दाखल करण्यात आलेला असुन त्यात या न्यासाचा कारभार पाहण्यासाठी विश्वस्त होणेकामी नि.क्र. ०१ नुसारखालील व्यक्तींची नावे सुचवलेली आहेत.

०१. श्री. अप्पाराव लहानु वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०२. श्री. अरुण दशरथ वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०३. श्री कैलास भास्कर पुरी — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०४. श्री. रत्नाकर गणपत वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०५. श्री. कैलास रामदास वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०६. श्री. अंकुश लक्ष्मण वाकळे — रा. भडंजी. पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद.
०७. श्री. ज्ञानेश्वर बाळा गवळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०८. श्री. बाळु महादु वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
०९. श्री. अंकुश मारोती वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
१०. श्री. बाबासाहेब नानासाहेब वाकळे — रा. भडजो, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
११. श्री. रतन रावसाहेब वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
१२. श्री. रमेश साहेबराव आंबे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद
१३. श्री. प्रकाश सांडु वाकळे — रा. भडजी, पो. गोळेगाव, ता. खुलताबाद जि. औरंगाबाद

०१. सदर प्रस्तावात मा. धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी दि.०३.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार उपरोक्त विश्वस्त होण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जदारांच्या नावाबाबत कोणास आक्षेप किंवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी आक्षेप संबंधित कागदपत्रांसह लेखो स्वरुपात दि. २०.०८.२०२५ रोजी स्वतः उपस्थित राहुन धर्मादाय सह आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्रकरणात दाखल करावा, तसेच मुदतीत आक्षेप सादर न केल्यास कोणास काहो सांगायचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश पारित केले जातील.

०२. तसेच न्यासाच्या योजनेप्रमाणे विश्वस्त होण्यासाठी इच्छुक व्यक्तींनी अर्ज मा. धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, बाबा पेट्रोल पंपच्या बाजुला, महावीर चौक, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात दि.२०-०८-२०२५ रोजी स्वतः उपस्थित राहुन प्रकरणात दाखल करावा, सदर विश्वस्त पदाचा कालावधी हा न्यासाच्या योजनेप्रमाणे राहील. तरी इच्छुकांनी कार्यालयीन वेळेत पुर्ण भरलेले अर्ज संपूर्ण नाव, जन्म तारीख, शैक्षणिक पात्रता, सामाजिक कार्याचा अनुभव असल्यास त्याबाबत माहिती नमुद करावी आणि त्यांच्या समर्थनार्थ शपथपत्र आवश्यक कागदपत्रांसह (निवडणुक ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड व वाहनचालक परवाना यापैकी एक) व भ्रमणध्वनी क्रमांकसह सादर करावेत. सदर व्यक्तिविरुध्द कुठल्याही प्रकारचे फौजदारी प्रकरण प्रलंबित नसल्याबाबतचे शपथपत्र दाखल करावे दि.२०-०८-२०२५ रोजीच्या कार्यालयीन वेळेत सादर करावेत वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अर्ज स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना असतील, तसेच या बाबतीत कुठलाही उजर अथवा आक्षेप ऐकला जाणार नाही. आज दि. १६-०७-२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या शिक्क्यानिशी सदरचे जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

आदेशावरुन

अधिक्षक न्याय
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर

## अग्रलेख...

# हिरवळ दाटो चोहीकडे...!

भारतीय कालगणनेतील पाचवा महिना श्रावण बहुधा जुलै-ऑगस्टमध्ये पावसाळी वातावरणात येतो. 'श्रवण' या नक्षत्रावरून आलेले हे नाव, निसर्गाच्या व पृथ्वीच्या पुनरुत्थानाचा कालखंड दर्शवते. या काळात, धरती नव्या हिरवाईने सजते आणि वातावरणात प्रसन्नता नांदते. श्रावण म्हणजे केवळ देवपूजा, उपवास आणि व्रतांचे अवकाश नव्हे, तर तो एक ऋतूंचा उत्सव आहे.□निसर्गाचा नवा जन्म, मातीचा सुगंध, शेतीचे चैतन्य, स्त्रियांचे साजशृंगार आणि कवींना प्रेरणा देणारा निसर्ग कवी गुरू ठाकूर यांच्या शब्दांत असा असतो,

**'मातीच्या गंधात झिंगून सांगतो, उनाड अल्लड वारा**
**सोनिया उन्हात न्हाऊन माखून, आल्या गं श्रावणधारा..'**

आषाढानंतर ढगांचा खजिना आभाळात भरून आलेला असतो आणि त्याचा मुक्तहस्ते वर्षाव होतो. झाडाझुडपांचा टवटवीतपणा, हरित रंगांचा मोह, ओसंडून वाहणारी नदीनाले आणि मधूनच उमटणारी चिमणपाखरांची किलबिल हे सारे असते. 'हसरा नाचरा, जरासा लाजरा, सुंदर साजिरा श्रावण आला..' असे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज आणि 'आला आषाढ श्रावण, आल्या पावसाच्या सरी, किती चातकचोचीने प्यावा वर्षाऋतू तरी..' असे मर्ढेकर सांगतात ते काही उगीच नाही. श्रावण हा महिना शिवभक्तीचा, संयमाचा आणि साधनेचा कालखंड मानला जातो. श्रावण सोमवारचे व्रत, महादेवाला जलअर्पण, बिल्वपत्र, धतूरा फुलांचे अर्पण हे या भक्तिभावाचे प्रतीक आहेत. या महिन्यात अनेक परंपरागत सणदेखील येतात. त्यात नागपंचमी हा सर्पपूजन आणि भूमीच्या संरक्षणाचा संदेश देणारा सण आहे. रक्षाबंधन हा भावाबहिणीच्या बंधाचे प्रतीकात्मक रूप आहे. हरितालिका हा स्त्रियांची एकतानता आणि व्रताचा सण आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी हा भगवान श्रीकृष्णाची भक्ती आणि लीलांचे स्मरण करणारा सण आहे. श्रावणातील हे सण केवळ देवपूजेपुरते मर्यादित नाहीत, तर ते सामाजिक, सांस्कृतिक संवादाचे माध्यम आहेत. विशेषतः स्त्रियांसाठी या महिन्याला एक स्वतंत्र सौंदर्य प्राप्त झालं आहे. श्रावण महिना म्हणजे स्त्रीसौंदर्याचा, श्रद्धेचा आणि संस्कृतीचा उत्सव. हिरव्या बांगड्या, चांदीचे तोडे, केसांमध्ये जाई-जुई, पाटावर बसून केलेली व्रतं हे फक्त सौंदर्यदर्शन नाही, तर एक शिस्तबद्ध, सांस्कृतिक बांधिलकीचं रूप आहे. झिम्मा-फुगडी, हरितालिकेची गाणी आणि ओव्या म्हणजे समूहातील स्त्री संवाद. त्यांच्या गाण्यात निसर्गाची उपमा, पतीची आठवण आणि देवीशी संवाद यांचा एक सुंदर समन्वय असतो. म्हणून तर शांता शेळके म्हणतात, 'श्रावण आला गं, वनी श्रावण आला, दरवळे गंध मधुर ओला..'. तर वेगळ्या शब्दांत ग. दि. माडगूळकर म्हणतात,

**'फांद्यांवरी बांधिले गं, मुलींनी हिंदोळे**
**पंचमीचा सण आला, डोळे माझे ओले..'**

पावसाळ्याचा मध्य असलेला हा श्रावण महिना म्हणजे शेतीच्या जोमाचा काळ. बियाणं पेरून झाल्यानंतर, या काळात शेतात उगवलेली रोपं टवटवीत असतात. शेतकऱ्याची सारी आशा या हिरव्या रांगांमध्ये गुंफलेली असते. जमिनीचा सुगंध, पाण्याची पातळी, आकाशाकडे बघून होणारे अंदाज हे सर्व भारतीय कृषी संस्कृतीचा आत्मा आहेत. आज शेतकरी बदलत्या हवामानामुळे आणि पावसाच्या अनिश्चिततेमुळे संकटात असला, तरी श्रावण हे त्याचं भावमनाचं पीक आहे. पावसावर आधारित हे शेतीचक्र जर सुसंगत चाललं, तरच अन्नदात्याच्या घरात आनंद नांदतो.

श्रावण महिना आपल्याला पर्यावरणासोबत नातं जपण्याची आठवण करून देतो. पारंपरिक भारतीय जीवनशैलीने पर्जन्य साठवणूक, गवताच्या पूजा, झाडे लावण्याची चळवळ यांसारख्या उपक्रमांतून पर्यावरण साक्षरता दाखवली जाते. ग्रामीण भागात जलस्रोतांची निर्मिती आणि शुद्धीकरण यासाठी श्रावणातील धार्मिक कार्यक्रम साधन म्हणून वापरले गेले आहेत. या ऋतूतील पाऊस हे केवळ हवामानशास्त्राचं प्रकरण नाही. तो आपल्या मनाच्या सांस्कृतिक कोनात भरतो. साहित्यिक दृष्टिकोनातूनही पावसाळ्याच्या या टप्प्याला एक आगळंवेगळं आकर्षण आहे. पाऊस म्हणजे विरह, ओलावा, आठवणी, शांतता आणि अनेकदा प्रेमाचं अधुरं व्यक्त होणं या सगळ्या भावनांचा वाहक असतो. श्रावण महिना हा साहित्यिक सृजनाचा एक प्रेरणादायी विषय आहे. मराठी काव्यात श्रावणाला भावनांच्या अनेक छटांमध्ये उभं केलं आहे. 'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे' किंवा 'श्रावणात घननिळा बरसला' अशा एका ओळीत संपूर्ण ऋतूचं चित्र उभं राहतं. ते शब्द निसर्गातील सौंदर्य आणि कोमल भावनांची सांगड घालतात. आजच्या शहरीकरणाने श्रावणाचे भावनिक आणि निसर्गीय स्वरूप बऱ्याच अंशी हरवलं आहे. काँक्रिटच्या जंगलात फुलांची जागा फुलदाण्यांनी घेतली, झाडांची जागा वॉलपेपरकडे आली आणि पावसाच्या नादाची जागा मोबाईल अलार्मने घेतली. ग्लोबल वॉर्मिंग, अनियमित पर्जन्य, नद्या कोरड्या पडणं किंवा पूर येणं या हवामान बदलाच्या समस्यांनी श्रावणातील नैसर्गिक सजीवता धोक्यात आली आहे. पावसामुळे विहिरी, नाले, ओढ्यांचे जतन, जलसंरक्षणाच्या उपक्रमांचा गाभा ठरतो. आधुनिक जीवनात प्लॅस्टिकचा वापर, सजीव-अजीव साखळीत हस्तक्षेप आणि शहरीकरणामुळे ही नैसर्गिक जीवनशैली सावरण्याचे आव्हान उभे करते. श्रावणाचं सौंदर्य पुन्हा अनुभवायचं असेल, तर आपल्याला निसर्गाशी पुनः एकदा नातं जोडावं लागेल. प्रत्येकाने स्वतःच्या घरात एक झाड लावणं, मुलांना श्रावणासंबंधी लोककथा सांगणं, पारंपरिक गाणी जपणं, हे लहान वाटणारे पण सांस्कृतिक वारसा टिकवणारी पावले ठरू शकतात.

विविधतेने नटलेला हा महिना, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी नवी प्रेरणा, सामाजिक ऐक्य आणि साहित्यिक जाणीव जागवणारा ठरावा, हीच आजच्या काळातील मराठी माणसाची खरी आवश्यकता आहे. सुविधा, साधने, तंत्रज्ञानाचा सुलभ वापर यांच्या बदल्यात जैवविविधतेची हानी, पारंपरिक ज्ञानाची गळती आणि पर्यावरणीय असमतोल. म्हणूनच 'हरित श्रावण'सारख्या चळवळी, वृक्षारोपण, पुनर्नवा जलस्रोत हे उपाय नव्या पिढीला आवश्यक ठरतात. श्रावणातील निसर्ग आपल्याला पर्यावरणपूरक जीवनशैलीचे महत्त्व शिकवतो. 'तरुण भारत' सारख्या दैनिकानेही आपल्या शताब्दी वर्षानिमित्त विविध प्रकारच्या बिया जमा करून त्यांचे घरोघर वाटप करणे, खासकरून प्राणवायू निर्माते वटवृक्ष आणि तुळशींची लागवड, मंदिरांची स्वच्छता असे विविध उपक्रम श्रावण महिन्यातच हाती घेतले आहेत. शिवभक्ती असो की निसर्गपूजन, दोन्हींमध्ये उपचार आला आहे. श्रावणात उपवास करणारी तरुण पिढीही 'डिटॉक्स डाएट' म्हणून या परंपरेला मानते. हे चित्र निराशाजनक असले, तरी यातून सकारात्मकता शोधली, तर सुधारण्याची आणि नव्याने रुजवण्याची संधी आहे. जो प्रयत्न 'तरुण भारत'सारख्या एका चळवळीनेच सुरू केला आहे. असे उपक्रम आता अशा संस्थांनी हाती घेणे ही काळाची गरज बनली आहे आणि तसे होताना आजूबाजूला दिसतही आहे, ही समाधानाची बाब आहे. बालकवींच्या या अजरामर ओळींमधील 'हिरवळ चोहीकडे दाटो..' अशीच भावना सर्वांची असेल,

**'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे क्षणांत फिरूनी ऊन पडे..'**

मराठी आणि इतरही भारतीय भाषांमध्ये श्रावण महिना, पावसाची नक्षी, निसर्गाची रंगछटा आणि मानवी सौंदर्य यावर विपुल कविता नावाजल्या आहेत. श्रावणाचा पहिला पाऊस हे अनेक कवींना भावलेलं चित्र आहे. जसे 'ऋतु हिरवा, ऋतु बरवा, पाचूचा वनी रुजवा, युगविरही हृदयावर सरसरतो मधुशिरवा..' अशा ओळी शांता शेळके लिहून जातात. तर प्रसाद कुळकर्णीसारखा नव्या पिढीचा कवी म्हणतो,

**'उल्हासाला फुटे पालवी, मनात फुलले ऋतू**
**मोर नाचती पंख पिसारून हर्ष जातसे उतू**
**मी एकांती, तुझ्या संगती, मीपण माझे भुलतो ग**
**क्षितिजकडेवरी पूर रुपेरी इंद्रधनुचा झुलतो ग..'**

## आंतरराष्ट्रीय

# रशियाच्या आडून भारताची कोंडी

**प्रा. जयसिंग यादव**

पुढील ५० दिवसांमध्ये युक्रेनमधील युद्धावर कोणताही करार झाला नाही, तर रशियाला मोठ्या प्रमाणात शुल्क आकारावे लागेल, असे अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांवर १०० टक्के शुल्क लादण्याचा स्वतंत्र इशारा दिला आहे. उत्तर अटलांटिक करार संघटनेचे (नाटो) सरचिटणीस मार्क रूट यांनी यांनी म्हटले की, भारत, चीन आणि ब्राझीलने व्लादिमिर पुतिन यांना फोन करून शांतता चर्चेबाबत गंभीर होण्यास सांगावे. असे न झाल्यास या तिन्ही देशांना मोठे परिणाम भोगावे लागतील. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले की, ''ऊर्जा सुरक्षा ही भारतासाठी प्राधान्याची बाब आहे. तेल आयातीच्या बाबतीत आम्ही बाजार आणि जागतिक परिस्थितीनुसार निर्णय घेतो. या प्रकरणात कोणत्याही प्रकारच्या दुटप्पी मानकांबद्दल आम्ही इशारा देत आहोत.'' भारताचे पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी म्हणाले की, आमच्यावर कोणत्याही प्रकारच्या दबावाचा परिणाम झालेला नाही. रशियाकडून तेल आयातीवर परिणाम झाला तरी भारताला तेल पुरवठ्याबाबत कोणतीही समस्या येणार नाही. कारण आमचा तेल पुरवठा कोणत्याही एका देशावर अवलंबून नाही. दुसऱ्यांदा सत्तेत आल्यापासून ट्रम्प रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी अनेक वेळा फोनवर बोलले आहे; परंतु कोणताही तोडगा काढू शकले नाहीत. भारत आणि चीन हे रशियन कच्च्या तेलाचे सर्वात मोठे आयातदार आहेत. तेल मंत्रालयाच्या मते, भारत तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८८ टक्के तेल आयात करतो. भारत रशियाच्या एकूण तेल निर्यातीपैकी ३८ टक्के तेल खरेदी करत आहे.

'चॅथम हाऊस' या थिंक टॅंकच्या मते फेब्रुवारी २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर हल्ला करण्यापूर्वी रशियाकडून भारताची तेल आयात दोन टक्क्यांपेक्षा कमी होती. बायडेन यांच्या कारकीर्दीतही भारतावर रशियाकडून तेल आयात थांबवण्याचा दबाव होता; परंतु मोदी सरकार त्यावेळी पश्चिमेला अतिशय आक्रमकपणे प्रतिसाद देत होते. ट्रम्प केवळ रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दलच भारताला धमकावत नाहीत तर 'ब्रिक्स'बद्दल सतत इशारा देत आहेत. त्यांना वाटते की, ब्रिक्स (ब्राझील, भारत, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका) हा अमेरिकन वर्चस्वाला आव्हान देणारा गट आहे. ट्रम्प यांनी ब्रिक्स देशांवर स्वतंत्र शुल्क लादण्याची धमकी दिली आहे. दुसरीकडे अमेरिकन सिनेटर रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टक्के कर लादण्याच्या विधेयकावर काम करत आहेत. या मुद्यावर भारतावरील दबाव वाढला आहे आणि हा दबाव अशा प्रकारे दुर्लक्ष करता येणार नाही. किंबहुना, भारताला दोन आव्हानांना तोंड द्यावे लागेल. रशियाकडून तेल आयात बंद झाल्यास भारताला स्वस्तात तेल मिळणार नाही. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढतील. यामुळे भारताला महागडे तेल खरेदी करावे लागेल. पण हा विषय फक्त तेलापुरता मर्यादित नाही.

अमेरिकेच्या मते भारताने रशियासोबत व्यापार थांबवावा; परंतु भारत हा दबाव मान्य करण्याची शक्यता नाही. ट्रम्प यांची धमकी प्रत्यक्षात आल्यास मात्र भारतासाठी समस्या वाढतील. भारतासोबत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करण्याबाबत चीनही आघाडीवर आहे. अमेरिका आणि 'नाटो'ने चीनलाही इशारा दिला आहे. याचा अर्थ असा की, ट्रम्प अनेक देशांशी खूप कडक वागत आहेत; परंतु ते ट्रम्प यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देत आहेत. त्यांच्याशी तडजोड करत आहेत; पण भारत हा चीन नाही. चीनने 'रेअर अर्थन मॅग्नेटिक' आणि अर्धवाहकांचा पुरवठा थांबवला होता. अशा परिस्थितीत, भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकणे हे चीनच्या बाजूने असेल का? यामुळे रशियाचे चीनवरील अवलंबित्व आणखी वाढेल आणि हे भारतासाठी कोणत्याही प्रकारे चांगले नाही. रशियाकडे आता चीनशिवाय पर्याय नाही. रशियाच्या एकूण तेल निर्यातीपैकी ४७ टक्के निर्यात चीनमध्ये होत आहे.

भारताचे रशियातील माजी राजदूत आणि भारताचे माजी परराष्ट्र सचिव कंवल सिब्बल यांनी मार्क रूट यांचे विधान पुन्हा पोस्ट करताना 'एक्स'वर लिहिले आहे की 'नाटो' आता भारताला धमकावत आहे. 'नाटो' प्रमुखांनीही चीनसमोर भारताचा उल्लेख केला आहे. भारत, चीन आणि ब्राझीलला धमकी देऊन 'नाटो' प्रमुख केवळ भू-राजकीय खोलीबद्दल त्यांचे अज्ञान दाखवत आहेत. नाटो सरचिटणीसांना अशा इशाऱ्यांचा परिणाम काय होईल हे माहीत नाही. तुर्कस्तान रशियाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करतो. तुर्कस्तान 'नाटो'चा सदस्य आहे. नाटो सरचिटणीस तुर्कस्तानवरही निर्बंध लादतील का? नाटो आपल्या सोयीनुसार तुर्कस्तानबाबत गप्प का आहे, असे प्रश्न उपस्थित होतात. युरोपीय महासंघ अजूनही त्याच्या तेलाच्या गरजेच्या सात टक्के कच्चे तेल रशियाकडून आयात करतो. हंगेरी आणि स्लोवाकिया हे दोन्ही देश 'नाटो'चे सदस्य आहेत. तेही रशियाकडून कच्चे तेल आयात करतात. त्यांच्याबाबतही मार्क रूट मौन बाळगतात. ट्रम्प युक्रेनमधील युद्ध थांबवू इच्छितात; पण पुतिन तयार नाहीत. रशियाला थेट लक्ष्य करण्याऐवजी ट्रम्प रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांना लक्ष्य करीत आहेत. चीन आणि भारत या जगातील दोन महत्त्वाच्या अर्थव्यवस्था आहेत. आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्थेच्या मते, रशियाने गेल्या वर्षी कच्च्या तेलाच्या निर्यातीतून १९२ अब्ज डॉलर्स कमावले. ट्रम्प या उत्पन्नाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न करीत आहेत; परंतु त्याचा परिणाम केवळ रशियापुरता मर्यादित राहणार नाही.

रशिया दररोज ७० लाख पिंपापेक्षा जास्त कच्चे तेल निर्यात करीत आहे. हा व्यापार विस्कळीत झाल्यास कच्च्या तेलाच्या किमती वाढतील. चीन रशियाकडून खरेदी करत असलेल्या तेलाच्या प्रमाणात घट करू शकतो; परंतु यामुळे रशियाबद्दल चीनचा दृष्टिकोन बदलणार नाही. अमेरिकेच्या इशाऱ्यामुळे चीन रशियावर दबाव आणण्याची शक्यता नाही. भारताने हा दबाव स्वीकारू नये, कारण हा अमेरिकेचा शेवटचा दबाव नसेल. त्यांच्या मागण्या वाढतच जातील. अमेरिकेचे यासंदर्भातले ध्येय निश्चित नाही. रशियाकडून तेल स्वस्तात उपलब्ध असल्यामुळे आपण ते खरेदी केले पाहिजे. आपण रशियाकडून खरेदी न केल्यास तेल महाग होईल आणि याचा थेट परिणाम भारतीयांवर होईल. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात भारताची रणनीती थोडी बदललेली दिसते. बायडेन यांच्या राजवटीत भारत अमेरिकेला अचूक उत्तर देत असे; पण आता तो गप्प आहे. चीनशिवाय दुसरा कोणताही देश बोलत नाही. ट्रम्प यांच्या मागण्यांना अंत नाही. अमेरिका टोल टॅक्ससारखे शुल्क मागत आहे. ज्या देशांसोबत अमेरिकेचा व्यापार करार झाला, तेदेखील या वर्तनाशी सहमत नाहीत. अमेरिकेतील लोकांना याचा फटका सहन करावा लागेल. त्यामुळे वास्तविक पाहता 'ब्रिक्स' देशांना धमकावून ट्रम्प यांच्या पदरात काहीच पडणार नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# जिवाचा गेम

**रेवती जोशी अंधारे**

मोबाईलवर गंमत म्हणून गेम खेळण्यास सुरुवात झाली. फळं कापणं, सारख्या रंगाच्या वस्तू जोडणं, फुगे फोडणं यासारख्या बिनडोक गेम्सच्या लेव्हल्स ओलांडण्यात जीवनाचं यश वाटू लागलं. मग, असं खेळून पैसेही कमावता येतात, हे कळलं. सुरुवातीला त्यातून चांगली कमाई झाली. मग, आपण जितका जास्त पैसा लावू, तितका जास्त फायदा, हे समजलं. जवळचा पैसा लावून गेम खेळण्यातील गंमत संपली आणि हा अस्सल धंदा असल्याचं लक्षात आलं. मग, घरातील लहान-मोठ्या वस्तू विकून गेमिंगमध्ये पैसा लावला. आता गेमिंगचं प्रमाण वाढलं असलं, तरी उत्पन्न मात्र हळूहळू कमी होत चाललं. शेती विकून आलेला पैसा गेमिंगमध्ये लावला. विरोध करणाऱ्या गर्भवती बायकोचा अडीच वर्षांच्या लेकीसह जीव घेतला. इतकं करूनही हाव संपत नव्हती आणि संयम साधत नव्हता. आत्महत्येचा पर्याय स्वीकारला.

गेल्या महिन्यात पुण्यात घडलेल्या या घटनेने अजून संवेदना शिल्लक कदाचित मोजक्याच लोकांना नवीन कोडं घातलंय. ऑनलाईन गेमिंगमधील काही प्रकार म्हणजे पैसे लावून खेळणं आणि यालाच आपण जुगार असेही म्हणतो. म्हणजे आतापर्यंत कुठेतरी आडोशाला बसून, पोलिसांपासून लपून खेळल्या जाणाऱ्या जुगाराला ऑनलाईन गेमिंग असं ब्रॅण्डनेम मिळालं. ७० च्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांचा वापर करून टाईमपास म्हणून गेम खेळण्याची सुरुवात झाली. आपल्यापैकी अनेकांनी इंटरनेट बंद झाल्यास उड्या मारत जाणाऱ्या छोट्याशा डायनासोरचा गेम खेळला असेलच. पण, तो तेवढ्यापुरताच! नवीन तंत्रज्ञानासह इलियॉनिस विद्यापीठाचा प्लेटो आणि एमयुडी म्हणजे 'मल्टी युजर डंज्न' या नेटवर्क गेमिंग प्लॅटफॉर्म्सने जोर धरला. पण, दोनच दशकांनंतर आलेल्या लॅन म्हणजे लोकल एरिया नेटवर्किंगने एकाच वेळी अनेकांना जोडण्याची क्षमता निर्माण केली आणि इथेच ऑनलाईन गेमिंगचा पाया रचला गेला. २१ व्या शतकाच्या सुरुवातीला 'मॅसिव्हली मल्टिप्लेयर ऑनलाईन गेम' या संकल्पनेचा उदय आणि प्रचंड वेगाने विस्तार झाला. मनोरंजनासाठी अज्ञात लोकांसोबत ऑनलाईन गेमिंगचा पर्याय जास्त ट्रेंडी आणि स्मार्ट ठरला.



दरम्यान, लोकांना बुद्धी गहाण टाकून निष्क्रिय करणाऱ्या खेळांमधून पैसे कमविता येतात याचा साक्षात्कार चतुर उद्योजकांना झालाच होता. वर्ष १९८४ मध्ये 'आयर्लंड्स ऑफ केस्माई' या पहिल्या ऑनलाईन गेमची सुरुवात झाली. 'ईझी मनी'ची ही भन्नाट कल्पना चाणाक्ष लोकांनी उचलून धरली. जास्त ग्राफीक्समुळे रंगबिरंगी आणि हॅपनिंग झालेले ॲक्शन गेम्स प्रचंड लोकप्रिय झाले. साधारण ९० च्या दशकात इंटरनेटमुळे कनेक्टिव्हिटीची नवी लाटच आली आणि डूम किंवा क्वेकसारखे गेम युवावर्गाच्या डोक्यात धुमाकूळ घालू लागले. फास्ट इंटरनेट, स्मार्टफोन आणि कॉम्प्युटरच्या लाटा आता आशियाचे दार ठोठावू लागल्या. पश्चिमेच्या कौतुकात नेहमीच अग्रेसर असलेल्या भारतीयांनी कवाडं उघडून या त्सुनामीला स्वतःच्या मेंदूचा ताबा दिला. भराभर चित्र बदलत गेलं. पाश्चिमात्यांसाठी भारत नेहमीच 'मोठी बाजारपेठ' राहिला आहे. भारतीयांची मानसिकता हेरून, ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून ईझी मनी मिळतो, हे सूत्र रुजविण्यात गेमिंग कंपन्या यशस्वी झाल्या.

युवकांवर प्रभाव पाडणारे हिरो-हिरोईन्स, क्रिकेटर्स, सोशल मीडिया इनफ्लुएन्सर्स या ऑनलाईन गेमिंगची जाहिरात करतात. झटपट आणि कमी श्रमात श्रीमंत होण्याचा हा मार्ग दाखविताना 'इस खेल की आदत लगना संभव है, जिम्मेदारीसे खेले' असा एका नाममात्र संदेश द्यायला कंपन्या विसरत नाहीत. हा संदेश दिला की, आपली जबाबदारी संपली, इतकी भावनाशून्यता तर नक्कीच आहे. झेनोफोबिया म्हणजे प्रवाहापासून वेगळे पडण्याची भीती, गेमिंगो व्यसन, सायबर हल्ले आणि फसवणूक, अनैसर्गिक हिंसाचारी वृत्ती, भावनाशून्य मन आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे कशाचंच काहीही न वाटणं! हे सगळे ऑनलाईन गेमिंगच्या व्यसनाचे परिणाम आता दिसू लागले आहेत. भारतविरोधी दहशतवादी कारवायांना पैसे पुरविण्यासाठी, जिहादी विचारांच्या प्रचारासाठी या गेम्सचा वापर हा आणखी एक आयाम आहेच. गेल्या तीन वर्षांत भारत सरकारने १,५२४ अवैध गेमिंग साईट्स आणि मोबाईल ॲप्सवर बंदी आणली आहे. आता महाराष्ट्र सरकारही यादृष्टीने विचार करत असल्याचं वृत्त आहे. पैसा कमविण्यासाठी श्रमाला पर्याय नाही तसाच, गेमिंगचं हे भूत युवावर्गाच्या मानगुटीवरून उतरविण्यासाठीही या बंदीला पर्याय नाही.

९८५०३३९२४०

## दखल

# देवाभाऊ... महाराष्ट्राचा नवा कोरा ब्रँड

**मोरेश्वर बडगे**

'शरद पवारांना समजायला शंभर जन्म घ्यावे लागतील' असे त्यांचे भक्त ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत एकदा म्हणाले होते. त्याच शरद पवारांवर 'देवेंद्र फडणवीस समजायला हजार वर्षे लागतील' असे म्हणायची वेळ आली आहे. फडणवीसांना आजवर टार्गेट करीत आलेले शरद पवार आज त्यांचे कौतुक करीत आहेत. निमित्त आहे देवेंद्र फडणवीस यांच्या ५५ व्या वाढदिवसाचे. शरद पवार म्हणतात, 'फडणवीसांच्या कामाची गती अफाट आहे. त्यांच्या कामाचा झपाटा, उरक, कष्ट पाहिले तर ते थकत कसे नाहीत, असा मला प्रश्न पडतो. उद्धव ठाकरे यांचाही गोंधळ कमी नाही. 'फडतूस गृहमंत्री', 'अनाजीपंत' आदी टोमण्यांनी देवेंद्र फडणवीस यांची एकेकाळी टिंगलटवाळी करणारे उद्धव ठाकरे आज त्यांच्या आरत्या ओवाळत आहेत. 'प्रामाणिक, हुशार राजकारणी' या शब्दात उद्धव यांनी फडणवीसांचे कौतुक केले आहे. 'अकेला देवेंद्र' ते 'चाणक्य देवेंद्र' हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रवास विरोधकांचे डोळे गरागरा फिरायला लावणारा आहे.

अवघ्या आठ महिन्यात महाराष्ट्राचे राजकारण किती बदलले आहे, याची ही साक्ष आहे. तब्बल ४० वर्षांपासून महाराष्ट्राचे राजकारण शरद पवारांभोवती फिरत आले. काहीही घडले तरी त्याचा संबंध पवारांशी जोडला जाई. 'शरद पवारांची गुगली', 'शरद पवारांनी गेम केला' असे बोलले जाई. पवार पावसात भिजले तर सीट आलीच समजा, इथपर्यंत हे माहात्म्य पोचले होते. पण आता दिवस फिरले. पवारांनी नुकतेच जयंत पाटील यांच्या जागी शशिकांत शिंदे यांना आणले. पवारांनी पलटवलेल्या या भाकरीची साधी चर्चासुद्धा नाही. राजकारणाची भाषा आता बदलली आहे. चर्चा आहे ती देवाभाऊ आणि त्यांच्या कारनाम्यांची- नेतृत्व गुणांची. प्रत्येक गोष्टीत फडणवीसांचा हात शोधला जात आहे. ठाकरे बंधू २० वर्षांनंतर एका व्यासपीठावर आले तेव्हा तर राज ठाकरे म्हणाले, ''बाळासाहेबांना त्यांच्या हयातीत जमलं नाही ते फडणवीसांनी जमवलं.'' 'बारामतीची गादी' खालसा झाली आहे. सत्तेचा फोकस आता बारामतीहून नागपूरला आला आहे.

विदर्भाचा नेता प्रथमच मुख्यमंत्री झाला अशातला भाग नाही. वसंतराव नाईक तब्बल ११ वर्षे मुख्यमंत्री होते. मात्र रिमोट कन्ट्रोल पश्चिम महाराष्ट्राकडे होता. फडणवीस मुख्यमंत्री हा बदल यासाठी महत्त्वाचा की सत्तेचा रिमोट विदर्भाकडे आला आहे. प्रत्येक पिढी एक नेत्याभोवती फिरते असा इतिहास आहे. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांच्यानंतर शरद पवारांनी ती जागा घेतली. कधीही निवडणूक न लढवलेल्या शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचाही एक जमाना होता. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे लवकर गेले. मुंडे असते तर राज्याचे राजकारण काही वेगळेच असते. या पोकळीत नितीन गडकरी यांनी आघाडी घेतली. त्याच काळात देवेंद्र फडणवीस पुढे येऊ पाहत होते. वयाच्या २२ व्या वर्षी नागपूरचे नगरसेवक, २७ व्या वर्षी महापौर, १९९९ पासून सलग आमदार, वयाच्या ४४ व्या वर्षी मुख्यमंत्री, पुढे पहाटेचा शपथविधी आणि आता तिसऱ्यांदा मुख्यमंत्री... मात्र हा संघर्ष सोपा नव्हता.



फडणवीस यांना आपण आज ज्या हिमालयाच्या उंचीवर पाहतो आहे ती त्यांची अवघ्या ११ वर्षांतली तपश्चर्या आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती त्या धुमश्चक्रीत महाराष्ट्राची धुरा नरेंद्र मोदी यांनी या तरुणाकडे दिली. पुढे फडणवीसांनी मागे वळून पाहिले नाही. स्वभावात मवाळपणा, कुठेही इगो नाही, सगळ्या गटातटांना सोबत घेऊन काम करण्याची खुबी... या जोरावर फडणवीस मोदींच्या मनात भरले. महाराष्ट्राने त्या निवडणुकीत मोदींना भरभरून जागा दिल्या. मोदी खूश झाले. मुख्यमंत्रिपदाची माळ फडणवीस यांच्या गळ्यात पडली. तब्बल तीन निवडणुका मोदींची मर्जी राखणं साधी गोष्ट नाही. मग तुम्हाला प्रश्न पडेल, फडणवीसांनी असे काय केले? चोवीस तास राजकारण करणाऱ्या कोणत्याही नेत्याने करायला पाहिजे तेच फडणवीसांनी केले. मोदींचे 'चॉकलेट बॉय' एवढीच फडणवीसांची पात्रता नाही. राजकारणामध्ये फक्त 'गॉडफादर' असून भागत नाही. त्याने दिलेल्या संधीचे सोने करण्यासाठी कष्टही उपसावे लागतात. मोदींचे राजकारण केवळ निवडणुकीपुरते नसते. तसेही भाजपाचे राजकारण आता पार्टटाईम राहिलेले नाही. पाचही वर्षे १८-१८ तास मेहनत आहे. फडणवीसांनी हेच 'वर्क कल्चर' स्वीकारले आणि पाळले. त्या जोरावरच फडणवीस आज आहेत त्या जागी दिसत आहेत. हा प्रवास गुलाबी नव्हता. २०१४ मध्ये त्यांना उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसोबत युतीत सरकार चालवावे लागले. २०१९ मध्ये जनमताचा कौल मिळूनही दगा झाला. मुख्यमंत्री होण्याच्या महत्त्वाकांक्षेने उद्धव ठाकरे यांना पछाडले होते. शरद पवारांनी उद्धव यांची ही नाजूक नस हेरली. काँग्रेसला सोबत घेऊन पवारांनी महाविकास आघाडी सरकारचे जुगाड जमवले. ते टिकणार नव्हतेच. अडीच वर्षांत कोसळले. ठाकरे यांच्या ४० आमदारांनी बंड करून ठाकरेंना घरी बसवले. तरीही एकनाथ शिंदे यांच्यासाठी फडणवीसांना मागच्या सीटवर बसावे लागले. पक्षासाठी फडणवीसांनी तोही त्याग केला. तिप्पट जोशाने काम केले. त्याची बक्षिसी त्यांना मिळाली. लागोपाठ तीन निवडणुकीत पक्षाला शंभरावर जागा जिंकवून दिल्या, एवढीच फडणवीसांची कामगिरी नाही. त्यांच्यातल्या 'चाणक्य'ने दोन-दोन पक्ष फोडले. शरद पवारांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना भाजपाच्या मार्गातले दोन मोठे अडथळे होते. शरद पवार कधीही मोठी ताकद नव्हती. जोडतोड करून पवार सत्तेच्या आश्रयाला राहत आले. पवारांना आपल्या स्वतःच्या हिमतीवर कधीही ७१ पेक्षा जास्त आमदार निवडून आणता आलेले नाहीत. फडणवीसांनी हा फुगा फोडला. पुतण्याकडूनच काकाचा पक्ष हायजॅक करवला. अजितदादा पवार आता भाजपासोबत महायुतीच्या सत्तेत सामील झाले आहेत. उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्व सोडले, त्याची शिक्षा जनतेने त्यांना दिली. आता तर उद्धव यांच्याकडे उरलेले बहुसंख्य नेते-नगरसेवकही एकनाथ शिंदे यांच्याकडे आले आहेत. शरद पवार म्हणा किंवा उद्धव ठाकरे; दोघेही संपल्यात जमा आहेत. त्यामुळे भाजपाचा २०२९ च्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. हे सर्व एका देवाभाऊचे ऑपरेशन आहे.

फडणवीसांनी केवळ राजकारण केलं नाही, विकासकारणही केलं. समृद्धी महामार्ग त्याची साक्ष आहे. शक्तिपीठ महामार्गाचे कामही लवकरच सुरू होईल. पायाभूत सुविधांचे अनेक प्रकल्प फडणवीसांच्या पुढाकाराने सुरू झाले आहेत. काँग्रेसवाले खूप गप्पा मारतात. मात्र गडचिरोली या विदर्भातल्या सर्वात मागास आणि आदिवासी जिल्ह्याची क्षमता फडणवीसच ओळखू शकले. आज त्यांच्या सर्वाधिक फेऱ्या गडचिरोलीला होतात. त्यांच्या लक्ष घालण्यामुळे तिकडचा माओवाद्यांचा त्रास कमी झाला. आता तिकडे पोलादाच्या खाणी सुरू होत आहेत. तुम्ही लिहून ठेवा, भविष्यात गडचिरोली देशाचा 'स्टील हब' म्हणून ओळखला जाईल. पूर्वी गडचिरोलीला जायला अधिकारी तयार नसत. आज ते चित्र बदलले आहे आणि हे एका फडणवीसाने शक्य करून दाखवले. हल्ली दिल्ली फडणवीस यांच्याकडे वेगळ्या नजरेने पाहू लागली आहे. भाजपाचा देशाचा उद्याचा चेहरा फडणवीस झाले तर नवल नको.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### एसटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक प्रश्न

अलिकडेच राज्याचा आर्थिक अहवाल, २०२५ चा अर्थसंकल्प आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विविध योजनांबाबतच्या सूचना पाहिल्यानंतर आर्थिक संकट किती खोलवर होत चालले आहे, याची जाणीव होते. राज्यावरील कर्जाचा डोंगर कमी होण्याऐवजी सतत वाढत चालला असल्याने महायुतीला पुन्हा सत्तेत बसवणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' तसेच इतर अनेक लोकप्रिय योजनांना अखेर अंकुश लावावे लागले आहे. यंदा शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे राज्य सरकारकडून सांगण्यात आले. महाविकास आघाडी सरकार असताना एसटी कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उगारले होते. त्यावेळी उद्धव ठाकरे यांच्या सरकारने कठोर भूमिका घेत शेकडो कर्मचाऱ्यांवर कारवाई केली होती. पण त्यानंतर ही कारवाई मागे घेत कर्मचाऱ्यांच्या वेतनात अखेर पाच हजार रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली होती. २०२२ मध्ये राज्यात सत्तांतर झाले त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नागरिकांना विविध प्रकारची स्वप्ने दाखवली. त्यापैकी एक म्हणजे एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात चार टक्के वाढ करण्यात आली. त्यापाठोपाठ या कर्मचाऱ्यांच्या वेतनात साडेसहा हजार रुपयांपर्यंतची वाढ करण्यात आली. प्रत्यक्ष स्थिती खूप वाईट आहे. एसटी कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन दिले तर जात नाही, पण एकूण पगारातील फक्त ५६ टक्के रक्कमच मार्च महिन्याच्या पगारात देण्यात आली. एका बाजूला जीवनावश्यक वस्तूंचे दर सतत वाढत असताना जगायचे कसे असा प्रश्न या कर्मचाऱ्यांसमोर उभा राहिला आहे. जनतेसाठी चालवली जाणारी परिवहन सेवा आणि योजना महायुती सरकारला अडचणीच्या ठरू लागल्या आहेत. एसटी महामंडळाचे शासकीय सेवेत विलीनीकरण करण्याची मागणी कर्मचाऱ्यांची आहे. सरकारने गांभीर्याने यातून प्रभावी मार्ग काढण्याची गरज आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

### ठाणवाई अर्थात तेलवातीची समई

आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच अमावास्येला आषाढी अमावास्या किंवा दीप अमावास्या असे म्हणतात. श्रावणाचा पवित्र महिना सुरू होण्याच्या आदल्या दिवशी ही अमावास्या येत असल्याने घरातील दिव्यांची पूजा केली जाते. दीप अमावास्या म्हणजेच आषाढी अमावास्या होय. दीप पूजन करून आगामी श्रावण महिन्याच्या स्वागताची तयारी केली जाते. अंधारातून प्रकाशाच्या वाटेवर नेणारा दिवा हा मांगल्याचं प्रतीक आहे. मांगल्य, समृद्धी आपल्या आयुष्यामध्ये नांदावी या प्रेरणेने आषाढ महिन्याच्या शेवटच्या दिवशी दीप पूजन करून दीप अमावास्या साजरी केली जाते. पावसाळ्यात कमजोर झालेल्या पचनक्रियेला चालना देण्यासाठी, मजबूत करण्यासाठी ही दीप अमावास्या दिव्यांच्या माध्यमातून प्रेरणा देऊन जाते. कंदील, विजेच्या दिव्याची पूजा शास्त्राला धरून नाही. महारतीसाठी एका ज्योतीस किमान दोन वाती असाव्यात. एका वातीवर कोणतीही आरती करू नये; कारण आरतीमधील ज्योत मानवी जीवनाचे प्रतीक असून दोन वाती म्हणजे आत्मा व पंचमहाभौतिक शरीर होत. तूपसदृश वसा (चरबी) युक्त वनस्पती तूप नामक द्रव पदार्थ (कृत्रिम तूप) माणसाप्रमाणे देवालासुद्धा ग्राह्य नाही. म्हणूनच शुद्ध तुपात भिजविलेल्या वातींचाच वापर करावा. घरातील सर्व दिवे गरम पाण्यामध्ये टाकून स्वच्छ धुवून घ्यावी. देवासमोर एक पाट मांडून त्या भोवती छान रांगोळी काढावी. पाटावरती सर्व दिवे मांडावे. त्या सर्व दिव्यांची हळद-कुंकू गुलाल वाहून पूजा करावी. फुलं वस्त्रमाळ हे दिव्यांवरती व्हावं. नंतर हे सर्व दिवे हे प्रज्वलित करून त्यांना हात जोडून नमस्कार करावा. दिव्याची पूजा केल्यावर महालक्ष्मी प्रसन्न होते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### पंजाब सरकारचा स्तुत्य निर्णय

पंजाब सरकारने नुकताच एक अभिनव व दूरदृष्टी ठेवून स्तुत्य निर्णय जाहीर केला आहे. लहान मुलांची तस्करी करून त्यांना चौका-चौकात भीक मागण्यास जबरी करून बायकांच्या कडेवर दयनीय अवस्थेत प्रस्तुत केले जाते आणि लोकांची सहानुभूती मिळवून भीक गोळा केली जाते. प्रत्येक वेळा ही शंका असते की ते मूल त्या बाईचेच आहे की नाही. मुलांच्या तस्करीवर आळा बसावा म्हणून पंजाब सरकारने लहान मुलांना कडेवर घेऊन संशयास्पद स्थितीत आढळणारे भिकारी यांची डीएनए टेस्ट (बालक आणि महिला-पुरुष) करून खात्री करून घेणार व गैरप्रकार आढळल्यास कठोर कार्यवाही करणार. पंजाब सरकारचा हा निर्णय कौतुकास्पद व इतर राज्यांनी अनुकरणीय असा आहे. मुलांच्या तस्करीवर व त्यांना भिकेला लावणाऱ्यांवर हा एक प्रभावी उपाय ठरेल असे वाटते.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### अमरावती-जबलपूर ट्रेन प्रयाग-काशीपर्यंत वाढवावी

प्रयाग-काशी येथे जाण्यासाठी दक्षिणेकडून ज्या गाड्या आहेत, त्या नेहमी हाऊसफुल असतात. त्यामुळे विदर्भातून तिथे जाणाऱ्या लोकांना फार त्रास होतो. जर अमरावती-जबलपूर एक्सप्रेस प्रयाग-काशीपर्यंत वाढविली तर विदर्भातील लोकांना त्याचा लाभ मिळेल. जागाही मिळण्याचे चान्सेस वाढतील. रेल्वे प्रशासनाने लक्ष घालून ही गाडी प्रयाग-काशीपर्यंत वाढविण्याची शिफारस करावी ही विनंती.

**चंद्रशेखर खापरे**/९४२३४२०१७१

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# पिंपळदरी येथे विविध मागण्यांसाठी आदिवासी समाजबांधवाचा रास्तारोको

## आंदोलनामुळे राज्य महामार्गावर वाहतुक कोंडी, चोख बंदोबस्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जुलै**

अनुसूचित जमातीच्या रिक्त पदांवर तात्काळ भरती करावी यासह इतर विविध मागण्यांसाठी आदिवासी समाज बांधवांच्या वतीने शुक्रवारी(ता .२५)औंढा-हिंगोली रोडवर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यामध्ये सकल आदिवासी समाज बांधव सहभागी झाले होते. आंदोलनामुळे औंढा-हिंगोली व हिंगोली-औंढा नागनाथ रोडवर दुतर्फा वाहतूक ठप्प झाली होती.

सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देऊन सुद्धा राज्यशासनाने अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची विशेष पदभरती केली नाही, अनुसूचित जमातीच्या रिक्त असलेल्या १२ हजार ५२० पदांची भरती तत्काळ सुरू करावी, शासकीय व निमशासकीय पद भरतीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात यावे, शासन निर्णय २०१९ नुसार जात पडताळणी समित्यांकडे प्रलंबित असलेल्या सशर्त वैधता करणाची चौकशी करून तत्काळ कार्यवाही करण्यात यावी, अनुसूचित जमातीच्या ८५ हजार रिक्त पदांची भरती विनाविलंब सुरू करावी यासह इतर विविध मागण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या साखळी उपोषणास समर्थन देण्यासाठी औंढा नागनाथ तालुक्यातील आदिवासी समाज बांधवांनी येथील पिंपळदरी फाटा येथे सकाळी अकरा वाजे दरम्यान रस्ता रोको आंदोलनाला सुरुवात केली. आंदोलनात शेकडो आदिवासी समाज बांधव सहभागी झाले होते. यावेळी शासन विरोधात प्रचंड घोषणा बाजी करीत समाजाच्या मागण्या तत्काळ मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनामुळे औंढा हिंगोली महामार्गावरील दुतर्फा वाहतूक एक तास ठप्प पडली होती. यामध्ये मानव विकासाची बसेस अडकून पडल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत वेळेवर पोहचता आले नाही. रास्ता रोको आंदोलन संपल्यानंतर महसूल नायब तहसीलदार प्रवीण ऋषी यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात माजी आमदार डॉ. संतोष टारफे यांच्या सह मारोती बेले, सुदाम खोकले, पांडुरंग मेटकर, शंकर शेळके, शेकुराव मुकाडे, अशोक दळवे, संजय भुरके, बालाजी धनवे, मुकुंद पोटे, शंकर शेळके, कृष्णा ठोंबरे, भल्ला कोकाटे, सखाराम बेले, ज्ञानदेव डहालके, केशव चिकाळकर,सिद्धनाथ चिकाळकर, अनिल पोटे, शैलेश रिठे, सोनू मुकाडे, धनंजय ढाकरे यांच्यासह औंढा नागनाथ तालुक्यातील सकल आदिवासी समाजबांधव उपस्थित होते.

आंदोलनस्थळी पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीधर वाघमारे, पोलीस उपनिरीक्षक दत्ता कानगुले, पोलीस उपनिरीक्षक अफसर पठाण, जमादार रविकांत हरकाळ, संदीप टाक गजानन गिरी, अमोल चव्हाण, राजकुमार कुटे, विजय कालवे, वसंत चव्हाण, रमेश मस्के यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी कडक बंदोबस्त दिला होता.

# रिक्त असलेले सहायक धर्मादाय आयुक्तपद तत्काळ भरावे

## विराट राष्ट्रीय लोकमंचची शासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जुलै**



हिंगोली जिल्ह्याची स्थापना १९९९ मध्ये झाली होती. आज हिंगोली जिल्हा होऊन जवळपास २६ वर्षाचा कालावधी लोटला तरीसुध्दा हिंगोली जिल्ह्यामध्ये सर्व विभाग पुर्ण क्षमतेसह व अधिकारासह कार्यरत झालेले नाहीत. त्यातही रिक्त झालेल्या पदावर तात्काळ नेमणुक न करता ईतर अधिकाऱ्यांकडे अनेक अतिरिक्त पदभार दिले जात असल्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांना कामासांठी अनेकवेळा चकरा माराव्या लागतात त्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असुन मोठ्या प्रमाणावर वेळ वाया जात आहे.

याचे उदाहरण म्हणजे हिंगोली जिल्ह्यास आजही अन्न औषध व प्रशासन विभाग परभणी वरून चालत आहे ज्या मुळे हिंगोली जिल्ह्यात भेसळ युक्तचे प्रमाण वाढतच चाललेले आहे ज्या कडे कोणीही लक्ष देण्यास तयार नाही

हिंगोली जिल्ह्यास सहायक धर्मादाय आयुक्त म्हणुन रविंद्र धायतडक हे अंदाजे २-३ वर्षापर्यंत कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळातील अनेक प्रकरणे प्रलंबीत होते. तारीख पे तारीख कार्यक्रम करुन अर्जदार व गैरअर्जदार दोघांनाही मोठ्या प्रमाणावर त्रास देण्यात येत होता. ज्यामुळे अनेक प्रकरणे आजही धुळखात न्यायप्रविष्ठ आहेत.याबाबत अनेक तक्रारी शासन व प्रशासनाकडे करण्यात आलेल्या होत्या.

धायतडक यांची बदली झाल्यानंतर हिंगोली जिल्ह्यामध्ये सहायक धर्मादाय आयुक्तांचे पद रिक्त असुन सदर पदाचा पदभार परभणी किंवा नांदेड जिल्ह्यातुन चालत असल्यामुळे सध्या नांदेड येथील अधिकारी आठवड्यातुन एक दिवस येऊन लहान सहान प्रकरणाची सुनावणी घेत निघुन जात आहेत.ज्यामुळे अनेक प्रकरणे कालमर्यादेत पुर्ण न होता कामाचा व्याप वाढत असुन मोठ्या प्रमाणावर प्रकरणे प्रलंबीत झालेली आहेत आणि सर्वसामान्य जनतेस कार्यालयामध्ये अनेकवेळा चकरा मारुन त्याचा त्रास सहन करावा लागत आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सहायक धर्मादाय आयुक्त हे रिक्त पद ज्युडिशीअरी विभागामधुन नेमणुक करुन हिंगोलीवासीयांना लवकरात लवकर न्याय देण्यात यावा अश्या मागणीचे निवेदन विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिल हिंगोलीच्या वतीने संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, जिल्हाध्यक्ष शेख बासित, उपाध्यक्ष रवि जैस्वाल, शेख अवेज, प्रमुख महासचिव शेख शाहनवाज हुसेन, महासचिव सतीश लोणकर, मो. आमेर, परवेज व सर्व पदाधिकारी व स्वयंमसेवकांनी मुख्यमंत्री तथा विधी व न्याय मंत्री, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन पाठविले आहे.

# बस स्थानकाऐवजी विद्यालयापर्यंत एसटी देण्यात यावी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जुलै**



औंढा नागनाथ तालुक्यातील लोहरा व इतर गावातील १२० मुली नागनाथ विद्यालयात शिकण्यासाठी मानव विकासच्या बसमध्ये दररोज प्रवास करतात परंतु सदरील एसटी बसस्थानकात मुलींना सोडते. बस स्थानकापासून नागनाथ विद्यालय सुमारे २ किमी अंतर असल्यामुळे मुलींना पायपीट करीत जावे लागते. सदरील एसटीचा थांबा बसस्थानकाऐवजी नागनाथ विद्यालयापर्यंत देण्यात यावा अशी मागणी या गावातील विद्यार्थीनींना आ. संतोष बांगर यांचेकडे शुक्रवारी केली.

औंढा नागनाथ तालुक्यातील लोहरा, काळीपाणी तांडा, लक्ष्मण नाईक तांडा, संघ नाईक तांडा, दरेगाव, दरेगाव तांडा या गावामधून इयत्ता ५ ते १२ पर्यंत शिक्षण घेण्यासाठी सुमारे १२० मुली दररोज सकाळी मानव विकासच्या एसटीमध्ये औंढा येथे ये जा करीत आहेत. परंतु सदरील एसटी ही मुलींना बस स्थानकात आणून सोडते. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे या मुलींना नागनाथ विद्यालयापर्यंत जाण्यासाठी २ किमी अंतर पायपीट करीत जावे लागते. त्यामुळे शाळा, महाविद्यालयाला जाण्यासाठी उशिर होतो तसेच शाळा, महाविद्यालय सुटल्यानंतर या मुलींना परत बसस्थानकापर्यंत येण्यास उशीर होत आहे. त्यामुळे सदरील एसटी ही नागनाथ विद्यालयापर्यंत करण्यात यावी अशी मागणी विद्यार्थीनींनी शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांचेकडे केली आहे. यावेळी विद्यार्थीनी व पालक यांची उपस्थिती होती.



**हिंगोली- येथील जिल्हा रूग्णालयात अनोळखी रूग्णावंर उपचार केल्यानंतर त्यांना त्यांच्याबद्दल विचारले असता त्यांनी त्यांचे नाव व गावाचे नाव सांगितले. त्यानंतर समाजसेवा अधीक्षक अमोल वाढे यांनी त्यांच्या नातेवाईकांना संपर्क साधला. अखेर वीस वर्षापासून कुटुंबापासून दुर असलेले चांगदेव मुकुंदराव देवतळे यांना त्यांच्या कुटुंबियांनी सुखरूप घरी नेले. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### रविवारी पत्रकार कार्यशाळेचे आयोजन

हिंगोली- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयांतर्गत असलेल्या येथील जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने रविवार, (दि. २७) रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात हिंगोली जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता उपस्थित राहणार आहेत. तसेच जिल्ह्यातील विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत विविध वक्त्यामार्फत वृत्तसंकलन, संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व, एआयचा वापर, पत्रकारांना देण्यात येणाऱ्या शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील जास्तीत जास्त पत्रकारांनी या कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते यांनी केले आहे.

### ७० वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७० वाहनचालकांविरूध्द विविध पोलिस ठाण्यांतर्गत पोलिस विभागाने कार्यवाही करीत त्यांच्याकडून ६२ हजार ९०० रूपयांचा दंड वसूल केला आहे तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत ६ ठिकाणी छापे मारून ६१२० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपींताविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत.

# हिंगोलीत ८ ऑगस्टपासून २७ बी सब ज्युनिअर राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जुलै**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात २७ वी राज्यस्तरीय सब-ज्युनियर फेन्सिंग स्पर्धा आयोजनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी आयोजनासंदर्भात महत्त्वाच्या बाबीवर आढावा घेऊन संबंधित यंत्रणांना सूचना दिल्या.

या बैठकीस निवासी जिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल पवार, नगरपालिका उपमुख्याधिकारी प्रकाश साबळे, पोलीस विभागाचे अखिल जब्बार व अतुल बोरकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे ए. ओ. कटोळे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एस. पी. डोंगरे, हिंगोली जिल्हा फेन्सिंग संघटनेचे अध्यक्ष कल्याण देशमुख, सचिव संजय भुमरे, सहसचिव नरेंद्र रायलवार आणि राष्ट्रीय खेळाडू संदीप वाघ आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दि. ८ ऑगस्ट ते दि. १० ऑगस्ट रोजी आयोजित राज्यस्तरीय सब ज्युनिअर फेन्सिंग स्पर्धेसाठी आवश्यक असलेल्या बाबीचा आढावा घेतला. यामध्ये जिल्हा क्रीडा संकुलात स्पर्धा होत असल्यामुळे त्या ठिकाणी खेळाडूंना सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी त्यांनी आवश्यक किरकोळ दुरुस्ती याचबरोबर स्वच्छतेची कामे करण्याच्या सूचना दिल्या. स्पर्धा कालावधीत खेळाडूंना भोजन, निवास या संदर्भात आढावा घेऊन आवश्यक सूचना केल्या. स्पर्धेच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त, आरोग्य विभागामार्फत सुसज्ज रुग्णवाहिका व वैद्यकीय पथक ठेवावेत. जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश मारावार यांनी आवश्यक ती तयारी करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

या बैठकीचे प्रास्ताविक असोसिएशनचे अध्यक्ष कल्याण देशमुख यांनी केले. या बैठकीत १४ वर्षांखालील मुला-मुलींसाठीची ही राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धा दिनांक ८ ते १० ऑगस्ट २०२५ दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, लिंबाळा (मक्ता), हिंगोली येथे संपन्न होणार आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सुरक्षा, निवास, भोजन, आरोग्य तपासणी, आणि मैदानी व्यवस्था याबाबत सविस्तर चर्चा झाली. हिंगोली जिल्ह्याला प्रथमच अशा दर्जेदार फेन्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान लाभत असल्याने सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे ठरवण्यात आले.

# हिंगोली जिल्ह्यासाठी आज ऑरेंज अलर्टचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जुलै**

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या हवामान अंदाजानुसार हिंगोली जिल्ह्यात दि. २५ जुलै २०२५ रोजी येलो अलर्ट तर दि. २६ जुलै २०२५ रोजी ऑरेंज अलर्ट घोषित करण्यात आलेला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता असून, विजेच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह मुसळधार ते अतिमुसळधार स्वरूपाचा पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

या नैसर्गिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत. विजेच्या गडगडाटासह पावसाची शक्यता असल्यास बाहेर जाणे टाळा. मोकळ्या जागेत असल्यास सखल भागात जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. बाल्कनी, छत किंवा ओट्यावर थांबू नका. घरातील विजेची उपकरणे बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर धातूच्या वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असल्यास तत्काळ सुरक्षित जागी हलवा. विजा चमकत असताना लँडलाईन फोन, विद्युत उपकरणांचा वापर, शॉवरखाली अंघोळ किंवा बेसिनच्या नळाला स्पर्श करू नये. धातूच्या तंबू किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाखाली थांबू नका. धातूच्या उंच मनोऱ्याजवळ थांबू नका. उघड्या दरवाजातून किंवा खिडकीतून वीज पाहण्याचा प्रयत्न करू नका. हवामान खात्याच्या सूचनांनुसार जिल्हा प्रशासन सतर्क असून आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तयार ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी सामाजिक माध्यमांवरील अपप्रचार टाळून अधिकृत माहितीवर विश्वास ठेवावा, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# शहरानजीक असलेल्या गंगा नगर, सुराणा नगर, अंतुले नगर भागातील रस्त्यांची दुरावस्था

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जुलै**







शहरानजीक असलेल्या गंगा नगर, सुराणा नगर आणि अंतुले नगर या नवीन वसाहतीतील रस्त्यांची दुरावस्था झाली असून या रस्त्यावरून पायी चालतांना नागरिकांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे तर वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. याकडे संबंधित ग्रामपंचायतींचे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरानजीक खटकाळी बायपास जवळ असलेली कारवाडी अंतर्गत गंगा नगर ही नवीन वसाहत आहे. याठिकाणी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच शिक्षक, राज्य राखीव दलातील कर्मचारी आदींनी नवीन घरे बांधली आहेत. परंतु या वसाहतीत मागील अनेक वर्षापासून नाल्या आणि रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. शहरानजीक या वसाहती आहेत. दररोज लाखो रूपयांच्या प्लॉटच्या खरेदी विक्रीचे व्यवहार तसेच इतर व्यवहार होत असल्यामुळे ग्रामपंचायतींना मोठे उत्पन्न आहे परंतु ग्रामपंचायत याकडे दुर्लक्ष करीत आहे. एक महिन्यापूर्वी गंगा नगर भागात पंचायत समितीच्यावतीने सिमेंट रस्त्यांची कामे करण्यात आली परंतु एकाच महिन्यात हे रस्ते संपूर्णपणे उखडल्यामुळे कामाच्या निकृष्ट दर्जा दिसून आला आहे. पावसाळ्यात या रस्त्यावरील सिमेंट वाहून गेले असून गिट्टी वर आली आहे. या रस्त्यावर जागोजागी पडलेल्या खड्ड्यात पाणी साचत असल्यामुळे पायी चालणे कठीण झाले आहे तर वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. पंचायत समितीच्यावतीने लाखो रूपये खर्च करून बांधण्यात आलेल्या रस्त्यांची एकाच महिन्यात दुरावस्था झाली आहे. ग्रामपंचायत केवळ महसूल गोळा करण्यात व्यस्त असून वसाहतीतील नागरिकांना सुविधा पुरवण्यात असमर्थ दिसत आहे.

चिखलवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत सुराणा नगर ही नवीन वसाहत असून या वसाहतीमध्येही मोठ्या संख्येने घरांचे बांधकामे झाली असून कर्मचाऱ्यासह इतर लोक या वसाहतीमध्ये राहत आहेत. नाल्या, रस्ते नसल्यामुळे रहीवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळा सुरू झाला असून कच्चे रस्ते असल्यामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचला आहे. रस्त्यावरून चालतांना महिला व लहान मुलांना तसेच वृध्दांना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे. अनुसया विद्यालयाकडे जाणारा रस्ता अत्यंत धोकादायक झाला असून अपघात होण्याची शक्यता आहे.

अकोला बायपास रोड परिसरातील अंतुले नगरमधील रस्त्यांचीही दयनीय अवस्था झाली असून रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे पाणी साचत असून या खड्ड्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

मागील अनेक वर्षापासून या वसाहती निर्माण झाल्या आहेत परंतु साध्या नाल्यांची कामे करण्यात आली नाहीत. त्यामुळे जागोजागी घाण पाणी रस्त्यावर येत आहे. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून साथीचे रोग पसरण्याची भिती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. संबंधित ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषद विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असून तत्काळ या वसाहतीमधील रस्त्यांची कामे करून नागरिकांना सुविधा द्याव्यात अशी मागणी रहीवाशी करीत आहेत.

# विद्युत प्रवाहामुळे खांबावरून पडून तरुणाचा मृत्यु



## निष्काळजीपणामुळे गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

केमवाडी (ता. तुळजापूर) येथील बाबासाहेब काळे यांच्या शेतामध्ये लाईटच्या खांबावर काम करत असलेल्या एका २४ वर्षीय तरुणाचा विद्युत प्रवाह लागून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी तामलवाडी पोलीस ठाण्यात निष्काळजीपणामुळे मृत्यू व जखमी केल्याच्या गुन्ह्यांतर्गत एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयताचे नाव अक्षय बाळकृष्ण सुतार (वय २४, रा. केमवाडी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) असे आहे. ही घटना दि.२६ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडली. अक्षय सुतार हे बाबासाहेब काळे यांच्या शेतातील विद्युत पोलवर काम करत असताना, गावडी दारफळ (ता. उत्तर सोलापूर) येथील आरोपी पोपट विष्णु लोकरे यांनी आपल्या शेतामधून निष्काळजीपणे व पूर्वसूचना न देता लाईट पुरवठा सुरू केला.

यामुळे रिटर्न करंट केमवाडी शिवारातील विद्युत पोलवर पोहोचून अक्षय सुतार यांना जोराचा विजेचा धक्का बसला आणि ते खांबावरून खाली पडले. यात ते गंभीर जखमी होऊन जागीच मरण पावले.

या घटनेनंतर मृताच्या आई विठाबाई बाळकृष्ण सुतार (वय ४५, रा. केमवाडी) यांनी दि.२४ जुलै २०२५ रोजी तामलवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून आरोपी पोपट लोकरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास तामलवाडी पोलीस करीत आहेत.

# व्हीआयपी सोबत मंदिर कर्मचाऱ्यांचे फोटोसेशन

**भ्रष्टाचार निर्मूलन समितीची कारवाईची मागणी... व्हीआयपींच्या फोटोसेशनमुळे तासनतास रांगेत थांबणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी अडथळा...**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२५ जुलै -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या व्हीआयपी भाविकांसोबत तुळजाभवानी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी तसेच माहिती अधिकारी नियम डावलून स्वतःचे फोटोसेशन करत असतात अशा नियमाचे उल्लंघन करणाऱ्या मंदिर कर्मचारी अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष विजय भोसले यांनी जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष यांना तक्रारीचे निवेदन दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, संपूर्ण महाराष्ट्रासह अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी देशभरातून दररोज हजारो भाविक तुळजाभवानी मंदिरात गर्दी करत असतात. भाविकांसोबतच राजकीय पुढारी, मंत्री, वरीष्ठ सनदी अधिकारी आदी व्हीआयपींची संख्या मोठ्या प्रमाणावर असते.



व्हीआयपींच्या दर्शनासाठी मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी विशेष व्यवस्था करत असतात. मात्र यावेळी मंदिर संस्थांचे जनसंपर्क अधिकारी तसेच माहिती अधिकारी नियम डावलून व्हिआयपी सोबत फोटो सेशन करत असल्याने मंदिर संस्थानच्या नावलौकिकास बाधा पोहोचत आहे. व्हीआयपीच्या सोबत फोटोसेशन करणाऱ्या माहिती अधिकारी तसेच जनसंपर्क अधिकाऱ्यावर देऊळ कवायत चा कायद्या नुसार कारवाई करावी व मंदिर संस्थानचा नावलौकीक वृध्दींगत होईल यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी सदरील निवेदनातून केली आहे.

### दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना मोबाईल बंदी आवश्यक...

व्हीआयपीच्या फोटो सेशनमुळे लाईन मध्ये तासनतास थांबणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी अडथळा निर्माण होतो. मंदिर संस्थानचे सुरक्षारक्षक सर्वसामान्य भाविकांना मोबाईल वर फोटो काढताना बंदी घालतात पण व्हीआयपी भाविक स्वतः त्यांच्याजवळील मोबाईल बाहेर काढून सुरक्षारक्षकांसमोर फोटो घेतात पण सुरक्षारक्षक त्यांना अडवत नाहीत यामुळे सर्वच भाविकांना पंढरपूरच्या धरतीवर जसे विठ्ठलाच्या दर्शनास जाणाऱ्या भाविकांना मंदिरात मोबाईल बंदी केली आहे त्याचप्रमाणे तुळजाभवानीच्या दर्शनास जाणाऱ्या प्रत्येक भाविकांचे मोबाईल महाद्वारातूनच काढून घेऊन मोबाईल बंदी केल्यास मंदिरात व्हीआयपी फोटोसेशन काही प्रमाणात तरी बंद होईल.

# हायवेवर ट्रकची ताडपत्री फाडून २.७२ लाखांचा माल चोरीला

## अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंद...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

एनएच ५२ हायवेवर तेरखेडा गावाजवळ एका ट्रकमधून तब्बल २.७२ लाख रुपये किमतीचा कपड्यांचा माल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी येरमाळा पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मोहम्मद छितर हनीफ (वय ४६, रा. अन्द्रोला, ता. हतीन, जि. पलवल, राज्य हरियाणा) हे आयशर ट्रक (क्र. टीएस ०७ यू ०६२५) घेऊन हैद्राबाद येथून माल भरून पुढील प्रवास करत होते.

दि.१० जुलै रोजी सकाळी ६ वाजता एनएच ५२ हायवेवरील तेरखेडा गावाजवळील एचपी पेट्रोलपंपाजवळ ट्रक थांबवून ठेवलेला असताना अज्ञात व्यक्तीने ट्रकची ताडपत्री फाडून त्यातील माल चोरून नेला.

चोरट्यांनी ट्रकमधून कपड्याचे एक बॉक्स, क्लॉथ लेबल असलेला एक कार्टून बॉक्स, प्रिंटेड साड्यांचे लेबल असलेला बॉक्स, 'डी. नं. २०३१' असे लेबल असलेला कार्टून बॉक्स, पल जॉर्जेट लेबल असलेला कार्टून बॉक्स असा एकूण २,७२,१७७ रुपये किमतीचा माल चोरून नेला. याप्रकरणी मोहम्मद हनीफ यांनी दि.२४ जुलै रोजी दिलेल्या तक्रारीवरून येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून अज्ञात आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत.

पुढील तपास येरमाळा पोलीस करीत आहेत.

# बेंबळी येथे ट्रॅक्टर अपघातात चालकाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील बेंबळी ते उंबरे गव्हाण रस्त्यावर एका दुर्दैवी अपघातात ट्रॅक्टर चालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना दि.२२ जून रोजी सायंकाळी ५.४५ वाजता घडली.

अनिल लक्ष्मण घोडके (वय ३२, रा. धनगर गल्ली, बेंबळी) हे ट्रॅक्टर (क्रमांक एमएच २५ डी ५०८८) चालवून सावळा नदीच्या पलीकडे उंबरे रोडवर जात असताना, त्यांनी ट्रॅक्टर निष्काळजीपणे व हायगियरमध्ये चालविल्यामुळे वाहनाचा ताबा सुटून ट्रॅक्टर पलटी झाला. या दुर्घटनेत अनिल घोडके स्वतः ट्रॅक्टरखाली अडकून गंभीर जखमी झाले आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# 'सिमाबाजी' मध्ये महिला बनु लागल्या आत्मनिर्भर

**हातात कला अन् जगण्याचा नवा दृष्टीकोनासह नवा आत्मविश्वास**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ जुलै -**

शहरातील सीमाबाजी बहुद्देशीय सामाजिक संस्थेमार्फत चालवण्यात येणाऱ्या विविध कार्यशाळेच्या माध्यमातून तालुक्यातील महिला व मुली केवळ आत्मनीर्भरच न्हवे तर जिवन जगण्याचा नव्या दृष्टीकोण प्राप्त करत आहेत.

शहरातील जावेद लदाफ आणि सिमा लदाफ या विवाहित जोडप्याने सिमाबाजी सा.बहु. संस्थेची स्थापना करून आपला तालुका व परिसरातील मुली व महिलाना आत्मनीर्भर बनवण्याची चळवळ सुरु केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून शिवणक्लास, मेहंदी काढणे, ब्युटी पार्लर चालवने अश्या विविध कलाकुसर शिकवले जातात. कोर्स पूर्ण करणाऱ्या मुली व महिलांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्राचे वाटप सोहळा शहरातील हमीद नगर भागातील दर्गा हॉलमध्ये दि.२० जुलै रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. पो.नि. अश्विनी भोसले, विभागीय युवती सेना निरीक्षक आकांशा ज्ञानराज चौगुले, शिवसेना नेत्या शिवाइ किरण गायकवाड, सायराबानो अत्तार आणि डॉ. ऋतुजा साळुंके आदी मान्यवर यावेळी उपास्थित होते.

दरम्यान युवा सेना विभागीय निरीक्षक किरण गायकवाड यांनी या संस्थाचालकांनी भेट घेऊन सर्व विद्यार्थीनीचे मनोबल वाढवले.

# शेतकऱ्यांनी रेशीम शेती व्यवसायातून आपली उन्नती साधावी : सिईओ मैनाक घोष

## झेडपी सिईओ ची आदर्श खुदावाडी गावास भेट...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२५ जुलै -**

शेतकऱ्यांनी इतर शेती व्यवसाय बरोबरच रेशीम शेती किंवा रेशीम उद्योग हा एक चांगला व्यवसाय आहे यातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक नफा मिळू शकतो तरी शेतकऱ्यांनी रेशीम शेती व्यवसायातून आपली उन्नती साधावी अशी प्रतिक्रिया जि.प.चे. मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांनी बोलताना केले.

तुळजापूर तालुक्यातील आदर्श खुदावाडी गाव पाहणी करण्यासाठी व येथील ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष आले होते यावेळी ते ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते.



यावेळी ग्रामपंचायतीच्या वतिने सरपंच सरोजिनीताई रेवणसिद्ध कबाडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांचा नागरी सत्कार केला. तसेच जलस्वराज्य प्रकल्पात आदर्शवत कामगिरी बजावलेल्या पाटील तांड्यात देखील जीपचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष यांनी सदिच्छा भेटी देऊन ग्रामस्थांची संवाद साधला यावेळी ग्रा.प. सदस्य सावंत पवार, हरी पवार सुरेश राठोड, गुरुनाथ राठोड यांनी सिईओ मैनाक घोष यांचा सन्मान केला. पाटील तांडा येथील डांबरीकरण रस्ता, नव्याने पाणी पुरवठा पाईपलाईन व पिण्याच्या पाण्याची टाकी यासह मागणी ग्रामस्थांनी केली यावेळी जिपचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) अनंत कुंभार, पंचायत समिती तुळजापूरचे गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे, विस्तार अधिकारी कावळे सह शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सरपंच सरोजिनीताई रेवणसिद्ध कबाडे, शरणाप्पा कबाडे, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन अमोल नरवडे, माजी पंचायत समिती सदस्य महादेव सालगे, बापू बोंगरगे,

ग्रामपंचायत सदस्य सावंत पवार, राम जवळगे, महेश बोंगरगे, तंटामुक्त अध्यक्ष वसंत कबाडे, शालेय कमिटी अध्यक्ष गणेश जवळगे, पोलीस पाटील बसवेश्वर सांगवे, ग्रामविकास अधिकारी गोरोबा गायकवाड, सोमनाथ कापसे, रामजी गायकवाड सह शिक्षक, ग्रामस्थ महिला उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
नियमित
वाचा...

# कळंब येथे संत शिरोमणी नामदेव महाराज पुण्यतिथीनिमित्त पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ जुलै -**

कळंब शहरात संत शिरोमणी नामदेव महाराज यांची पुण्यतिथी अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने शहरातून भव्य पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. मिरवणुकीस विठ्ठल मंदिरातून प्रारंभ होऊन शहराच्या प्रमुख मार्गांवरून ती पुनः विठ्ठल मंदिर येथे समारोप झाली.

या मिरवणुकीत विठ्ठलाची प्रतिमा असलेला आकर्षक रथ आणि महिला-पुरुष भजनी मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

भजनी मंडळांनी पंढरी नामाचा बाजार, नामच घेता नामच देता, कोटी कोटी कुळी उद्धार अशा अभंगांच्या गजरात संपूर्ण शहरात भक्तिरसाची उधळण केली. मिरवणुकीनंतर आरती व महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



कार्यक्रमाला धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघाचे आमदार कैलास घाडगे पाटील यांनी हजेरी लावून संत नामदेव महाराज पालखीचे दर्शन घेतले.

याप्रसंगी बाबासाहेब कल्याणकर, प्रा. दिलीप पाटील, सागर बारटक्के, सचिन धोकटे, शशिकांत बारटक्के, अतुल मुळे, ज्ञानेश्वर बारटक्के, गजेंद्र बारटक्के, बबन बारटक्के, शुभम धोकटे, यांच्यासह विविध भजनी मंडळे, नागरिक आणि समाजबांधव उपस्थित होते.

# आगामी निवडणुकांसाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे : ॲड. अशोक पटवर्धन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जुलै -**

आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उमरगा-लोहारा तालुक्यातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक मराठवाडा शिवसेना सचिव ॲड. अशोक पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच जिल्हाप्रमुख मोहन पणूरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

या बैठकीत बोलताना ॲड. अशोक पटवर्धन यांनी सांगितले की, आगामी निवडणुकांमध्ये शिवसेनेचा विजय सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने आता पासूनच नियोजनबद्धपणे कामाला लागणे आवश्यक आहे. शासनाच्या विकासात्मक



योजना, आरोग्य विषयक सेवा व वैयक्तिक लाभाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहचवणे, हे कार्य प्रत्येक शिवसैनिकाने जबाबदारीने पार पाडावे, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीस शब्बीर गवंडी, बळीराम सुरवसे, जगन पाटील, विलास भगत, बलभीम येवते, व्यंकट पाटील, बी.के. पवार, आप्पासाहेब पाटील, शेखर पाटील, दिपक जोमदे, राजेंद्र शिंदे, परवेज तांबोळी, अनंत बायस, संदीपान बनकर, परमेश्वर साळुंखे, जितेंद्र सूर्यवंशी, सुरेश मंगरुळे, अभिमान खराडे, अमीन सुंबेकर, प्रमोद बंगले, ओम कोरे, आरीफ खानापुरे, प्रताप लोभे आदिंसह पदाधिकारी उपस्थित होते.

# नगरपालिकांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमरगा व मुरूममध्ये युवकांची 'तुतारी'कडे झुकती कास

**लिंगायत समाजाच्या नेतृत्वाखाली पारंपरिक पक्षांना धक्का?**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२५ जुलै -**


उमरगा आणि मुरूम नगरपालिकांच्या निवडणुकांचे ढग गडगडू लागले असताना, सत्ताधारी भाजप व शिवसेना यांच्या पारंपरिक राजकारणाला 'तुतारी' गटातून नव्या युवकांनी मोठं आव्हान उभं केलं आहे. विशेष म्हणजे लिंगायत समाजातील जागरूक आणि संघर्षशील युवकांचा या नव्या चळवळीकडे कल वाढताना दिसतोय, ज्यामुळे पारंपरिक पक्षांच्या गोटात अस्वस्थता वाढली आहे.

'तुतारी' हे केवळ नाव नाही, तर नव्या राजकारणाची गर्जना बनत चाललं आहे. युवकांनी राजकीय सत्तेच्या केंद्रस्थानी पोहोचण्यासाठी बैठका, जनसंवाद, लोकप्रतिनिधींना थेट प्रश्न विचारण्यास सुरुवात केली असून, विकासाच्या गप्पा पुरे आता, कृती हवी! असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे.

शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी, महिला सुरक्षा, मूलभूत नागरी सुविधा या मुद्द्यांवर केवळ घोषणा करून मते मिळवण्याचा काळ संपला असून, तुतारीचे कार्यकर्ते आता या मुद्द्यांवर ठोस कृतीचे वचन देताना दिसत आहेत.

लिंगायत समाजाचा ठळक सहभाग ही या आंदोलनाची 'रीढ' ठरू लागली आहे. पारंपरिक पक्षांच्या मतदारघटकातच आता नाराजीचा सूर उमटतोय.

हेच मतदार आता नव्या पर्यायाच्या शोधात असून, 'तुतारी' गट हीच आशेची नवी किरण ठरत आहे. सध्या तुतारीकडून



उमेदवारांची अधिकृत घोषणा झाली नसली, तरी जनतेशी त्यांचा थेट संपर्क, संघटीत योजना आणि मुद्द्यांवर आधारित दृष्टिकोन यामुळे दोन्ही नगरपालिकांतील राजकीय समीकरणं ढवळून निघण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भाजप व शिवसेनेसाठी ही नवयुवकांची चळवळ म्हणजे निवडणुकीआधीच वादळाची चाहूल ठरत आहे.



## जाहीर नोटीस

### प्रकरण

जा.क्रमांकः ११००५
**नगर परिषद कार्यालय, मुरुम,**
जि.धाराशिव
दिनांक : ०२/०७/२०२५

सर्व लोक कळविण्यात येते की, **श्री. रविंद्र व्यंकटराव माने, सुभाष चौक, मुरुम** यांनी घर **नं.३९७७** चे खरेदीखताआधारे नामांतरणाकरिता अर्ज दाखल केला आहे. बांधकामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**-घराची चर्तु:सीमा-**

**पुर्व** : महेश्वरी प्रगती मंडळाची जागा
**पश्चिम** : सरकारी रस्ता
**दक्षिण** : प्लॉट नं.०५ ची जागा
**उत्तर** : सरकारी रस्ता

तरी **वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत** ज्या कोणा हितसंबंधी व्यक्तीस जी काही तक्रार असेल ती (१५) दिवसाचे आत लेखी दाखल करावी. मुदतीनंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**न.प मुरुम,**

## जाहीर नोटीस

### प्रकरण

जा.क्रमांकः ११००६
**नगर परिषद कार्यालय, मुरुम,**
जि.धाराशिव
दिनांक : ०२/०७/२०२५

सर्व लोक कळविण्यात येते की, **श्री. दत्ता आनंद भुसाळे, किसान चौक, मुरुम** यांनी घर **नं.३९७४** चे खरेदीखताआधारे नामांतरणाकरिता अर्ज दाखल केला आहे. बांधकामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**-घराची चर्तु:सीमा-**

**पुर्व** : सरकारी रस्ता
**पश्चिम** : प्लॉट नं.६१ ची जागा
**दक्षिण** : प्लॉट नं.०२ ची जागा
**उत्तर** : सरकारी रस्ता

तरी **वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत** ज्या कोणा हितसंबंधी व्यक्तीस जी काही तक्रार असेल ती (१५) दिवसाचे आत लेखी दाखल करावी. मुदतीनंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**न.प मुरुम,**

## जाहीर नोटीस

### प्रकरण

जा.क्रमांकः ११००४
**नगर परिषद कार्यालय, मुरुम,**
जि.धाराशिव
दिनांक : ०२/०७/२०२५

सर्व लोक कळविण्यात येते की, **श्री. कालिदास घैनिनाथ चौधरी, सुभाष चौक मुरूम** यांनी घर **नं.३९७६** चे खरेदीखताआधारे नामांतरणाकरिता अर्ज दाखल केला आहे. बांधकामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**-घराची चर्तु:सीमा-**

**पुर्व** : सरकारी रस्ता
**पश्चिम** : प्लॉट नं.६३ ची जागा
**दक्षिण** : प्लॉट नं.०४ ची जागा
**उत्तर** : सरकारी रस्ता

तरी **वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत** ज्या कोणा हितसंबंधी व्यक्तीस जी काही तक्रार असेल ती (१५) दिवसाचे आत लेखी दाखल करावी. मुदतीनंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**न.प मुरुम,**

## जाहीर नोटीस

### प्रकरण

जा.क्रमांकः ११००३
**नगर परिषद कार्यालय, मुरुम,**
जि.धाराशिव
दिनांक : ०२/०७/२०२५

सर्व लोक कळविण्यात येते की, **श्री. ज्ञानेश्वर वसंतराव चौधरी, सुभाष चौक मुरूम** यांनी घर **नं.३९७५** चे खरेदीखताआधारे नामांतरणाकरिता अर्ज दाखल केला आहे. बांधकामाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**-घराची चर्तु:सीमा-**

**पुर्व** : प्लॉट नं.६४ ची जागा
**पश्चिम** : सरकारी रस्ता
**दक्षिण** : प्लॉट नं.०३ ची जागा
**उत्तर** : सरकारी रस्ता

तरी **वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत** ज्या कोणा हितसंबंधी व्यक्तीस जी काही तक्रार असेल ती (१५) दिवसाचे आत लेखी दाखल करावी. मुदतीनंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**न.प मुरुम,**

# पाण्यात पोहून रेती तस्करांचा पाठलाग

## ग्रामीण पोलीसांच्या कारवाईत २१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२५ जुलै -**

विष्णूपुरी शिवारातील गोदावरी नदीपात्रात काल सायंकाळी नांदेड ग्रामीण पोलिसांनी छापा टाकून २१ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.



ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना मिळालेल्या माहितीनुसार विष्णूपुरी शिवारात गोदावरी नदीपात्रातून काही रेती माफिया हे इंजिन व तराफ्याच्या साह्याने अवैधरित्या रेतीचा उपसा करुन रेतीची नदीकाठावर साठवणूक करीत आहेत. या माहितीच्या आधारे काल सायंकाळी चिंचोलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी त्याठिकाणी छापा टाकला. पोलिसांना बघून पाच ते सहा आरोपी नदीमध्ये उडी मारुन पलिकडच्या किनाऱ्यावर पोहुण पळून गेले. त्यानंतर दोन आरोपींना नदीपात्रातून पोहुण ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने त्यांचा पाठलाग केला. व त्यांना ताब्यात घेतले. या नदीपात्रातून अवैधरित्या उपसा करुन काठावर आणून साठवलेली अंदाजे २५ ब्रास रेती ज्याची किंमत १ लाख २५ हजार रुपये, पाण्यातून रेती उपसा करणारे सहा इंजिन ज्यांची किंमत बारा लाख रुपये, रेती उपसा करण्यासाठी वापरलेले एकूण १७ तराफे आठ लाख ५० हजार रुपये असा २१ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तर काही तराफे त्याच ठिकाणी आग लावून जागीच नष्ट करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या नविन परिपत्रकानुसार आरोपीवर चार कलमाप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले. आरोपीमध्ये पांडूरंग हंबर्डे रा.विष्णूपुरी, अच्छेलाल गुलाबचंदराम रा.लक्ष्मणपूरा जि.बलिया उत्तरप्रदेश व इतर सहा असे आठ आरोपी अटक करण्यात आले आहेत. पोलिसांची हि धाडसी कारवाई करताना पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक बाबुराव चव्हाण व अन्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. याबाबत प्रमोद कऱ्हाळे पोलीस कर्मचारी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदरच्या आरोपीविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मालवाडा घाटातील रखडलेल्या रस्त्याच्या कामाला सुरुवात : आमदार केराम यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.२५ जुलै -**


किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मालवाडा घाट रस्त्याच्या कामाला अखेर सुरुवात झाली असून, हे श्रेय केंद्रातील केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार भीमराव केराम यांना जाते, असे मत भारतीय जनता पक्षाचे किनवट शहर अध्यक्ष तथा नगरसेवक गोपू महामुने यांनी व्यक्त केले.



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ वरील धनोडा ते पाटोदा या रस्त्यावर असलेल्या मालवाडा घाटातील रस्ता रखडलेला होता. अनेक वर्षांपासून वनविभागाच्या परवानगीअभावी हे काम थांबले होते. मात्र आमदार केराम यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि दिल्ली दरबारी प्रभावी पाठपुराव्यामुळे सर्व अडथळे दूर होऊन अखेर रस्त्याच्या कामाला सुरूवात झाली आहे.

गोपू महामुने यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून या भागातील नागरिक मालवाडा घाटातील अपूर्ण रस्त्यामुळे त्रस्त होते. अर्धवट नाल्यांची कामे, अपूर्ण पथदिवे, अरुंद रस्ता आणि दुभाजक नसल्यामुळे अपघातांची मालिका सुरू होती. मात्र आमदार केराम यांनी हे प्रश्न गांभीर्याने घेतले आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून हे अशक्य वाटणारे काम मार्गी लावले.

ते पुढे म्हणाले, पाच-सहा वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या महामार्गाच्या कामात अनेक त्रुटी राहिल्या होत्या. दत्तचौक ते न्यायालय परिसरात दुभाजकाचा अभाव,



पेव्हरब्लॉकचा अभाव, अंधारामुळे अपघात आणि भाविकांची गैरसोय यामुळे नागरिकांमध्ये असंतोष होता. पण आज ही कामे मार्गी लागत आहेत हे आमदार केराम यांच्या कार्यशैलीचे फलित आहे. या कामामुळे तिर्थक्षेत्र माहूर व आसपासच्या भागातील लाखो भाविक व स्थानिक नागरिकांना दिलासा मिळणार असून, सुरक्षित आणि सुविधा असलेला रस्ता लवकरच साकार होईल, असा विश्वास देखील यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त



### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या संवाद बैठकीस नांदेडचे विश्वनाथ जटाळे यांना निमंत्रित

**नवीन नांदेड-** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समाजासह विविध मागास समाजाच्या संदर्भात संवाद बैठकीचे आयोजन दिनांक २१ जुलै २०२५ रोजी राष्ट्रपती भवन नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. या बैठकीचे निमंत्रण नांदेड वसरणी येथील आदिवासी जमातीतील कोळी महादेव समाजाचे सेवानिवृत्त पोलिस अधीक्षक तथा भाजपा नांदेडचे अनुसूचित जमाती मोर्चा महानगर अध्यक्ष विश्वनाथ नामदेव जटाळे यांना निमंत्रित करण्यात आले होते . भारतीय जनता पार्टी व संघाच्यावतीने भारतातील विविध जमातीतील मागास प्रवर्गातील विविध समस्यांची पूर्तता करण्यासाठी पूर्ण महाराष्ट्रातून विविध जाती-धर्मातील शासकीय, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील उच्चतम पदावरून कार्य करणारे व सेवानिवृत्त झालेले पदाधिकारी, अधिकारी यांना गोपनीय पत्र पाठवून राष्ट्रपती भवन दिल्ली येथे बोलवण्यात आले होते. सदरील बैठकीत समाजातील वंचितांच्या गरजा जाणून घेऊन त्यांची पूर्तता करण्यासाठी सरकारकडे पाठवाव्यात तळागाळातील समाजापर्यंत हे सरकार पोहोचले पाहिजे, यासाठी महाराष्ट्रातून ४० लोकांचे दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संवाद बैठक दिनांक २१ जुलै २०२५ रोजी घेण्यात आली . या बैठकीला नांदेड येथील वसरणीचे सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक विश्वनाथ जटाळे यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. तेव्हा या बैठकीत आपल्या समाजातील काही समस्या राष्ट्रपती यांच्याकडे मांडण्यात आल्या, जात वैधता प्रमाणपत्रासाठी होणारी नागरिक, पालक व विध्यार्थी यांची हेळसांड तात्काळ सोडविण्याची मागणी आयोजित संवाद बैठकीत सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक तथा भाजपा नांदेडचे अनुसूचित जमाती मोर्चा महानगर अध्यक्ष विश्वनाथ नामदेव जटाळे यांनी केली.यावेळी केंद्रीय आदिवासी मंत्री जे.एल.ऊराव, राज्यमंत्री दुर्गादास ऊईके,भाजपा जनजाती मोर्चा अध्यक्ष खा.समीर ओराव, महाराष्ट्र जिल्हा संघटन मंत्री किशोर काळकर, महामंत्री प्रकाश गेडाम, सुदर्शन शिंदे,राजश्री काळे, रमेश मावसकर यांच्यी उपस्थिती होती. राष्ट्रपती यांनी प्रथमच नवी दिल्ली येथे बोलवल्या या आदिवासी समाजाच्या प्रश्ना बाबत घेतलेल्या आढावा संदर्भ संवाद बैठकी मुळे जात वैधता प्रश्नासह आनेक प्रश्न मार्गी लागतील.सदरील बैठकी नंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू समवेत स्नेह भोजनाचा अनोखा आनंद मिळाला. सगळी अधिकारी हे गरिबी परिस्थिती जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन उच्चतम पदावर गेलेल्या पदाधिकाऱ्यांना समाजाची सेवा करण्याची संधी भारतीय जनता पार्टी व संघाच्या वतीने आम्हाला मिळाली. सरकारने दिलेली जबाबदारी आम्ही निपक्ष पार पाडू दिलेल्या संधीचे सोने करून शासनाच्या विविध योजना तळागाळातील समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करू असे मत सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक विश्वनाथ जटाळ यांनी व्यक्त केले.

### मुदखेड शहरात अजित पवार यांचा वाढदिवस मूकबधिर शाळेत साजरा



**मुदखेड-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री तसेच भावी मुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील निवासी मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना फळे वाटप करण्यात आले व मूकबधिर विद्यार्थ्यांच्या हाताने केक कापून अजित दादा पवार यांना वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा दिल्या व अजित पवार हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली. यावेळी प्रमुख उपस्थिती राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे नांदेड उत्तरचे माजी जिल्हा अध्यक्ष सौ पूजाताई व्यवहारे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष मोहम्मद बुऱ्हाण,तालुका कार्याध्यक्ष शंकर पाटील गंडरस, तालुका सचिव दिलीप सरोदे, जिल्हा सरचिटणीस राहुल चौदंते, शहर उपाध्यक्ष मोहम्मद हकीम, ज्ञानेश्वर गायकवाड, शहर उपाध्यक्ष आनंदा प्रभाजी निखाते, विनायक देशमुख, सलमान खान पठाण, माधव पाटील व्यवहारे, यासह निवासी मूकबधिर शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष मोहम्मद बुरहान यांनी केले होते.

# मोटर रिवायडींग करणाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लुट

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.२५ जुलै -**

हदगाव शहरातील पाण्याची मोटर रिवायडींग, बोअर दुरुस्ती करणाऱ्या दुकानदारांकडून शेतकरी बांधव व सामान्य नागरिकांची बेफाम लूट चालु असून त्यांच्या मनमानी पुढे सर्वचजण हतबल झाले आहेत. मालकाची मजुरी, कारागिरीची मजुरी वेगळी अशी नामी शक्कल लढवत एखाद्या डॉक्टर पेक्षाही पाचपट जास्त यांची मजुरीची दर सामान्य नागरिक व शेतकरी वर लादत असून यांच्यामुळे शेतकरी बांधव व सामान्य नागरिकांची



आर्थिक पिळवणूक जोमात होत असून याकडे लक्ष कोण देणार असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे .

हदगाव शहरात मिळलेल्या माहितीनुसार अंदाजीत १५ ते २० दुकाने हे मोटार रिवायडींग चे आहेत . यांची कोणतीही प्रकारची युनियन अथवा संघटना नसल्याकारणाने यांच्या मनात आले तशी रक्कम ही नागरिकांकडून घेत आहेत .बोअरची सबमर्सिबल मोटर काढण्यापासून ते टाकण्यापर्यंतचे यांचे दर वेगवेगळे असतात तर शेतकरी बांधवांकडून मोटर रिवायडींग करण्याकरिता मोठ्या प्रमाणात रक्कम मनमर्जी प्रमाणे उकळली जाते. काही नागरिकांनी तर थेट आरोप केला की , दुकानावर जाऊनच आम्हाला आपली मोटर तपासणी करावी लागते आणि इथूनच यांची मनमानी सुरू होते अमुक वस्तू गेली मोटर जळाली , बेअरिंग, बुश इत्यादी वस्तू टाकावे लागते असे सांगून मोकळे होतात. नागरिकांना त्यांना होकार दिल्याशिवाय पर्यायच राहत नसल्याने याचा फायदा काही मुजोर मोटर रिवायडींग दुकानदार घेत असून त्यांच्यावर आळा कोण घालणार असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. तर एक मतप्रवाह असाही आहे की, काम केले तर पैसे घ्यावे पण पूर्ण शहरात सरसकट एकच दर फलक राहावा जेणेकरून कुणाची लुबाडणूक होणार नाही.

# कर्जमाफी, रोजगार आणि प्रलंबित प्रश्नांवर नरसीत 'प्रहार'चा चक्का जाम



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२५ जुलै -**

राज्यातील शेतकरी, विधवा महिला, दिव्यांग व्यक्ती तसेच सुशिक्षित बेरोजगारांचे दीर्घकाळापासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, या मागण्यांसाठी प्रहार जनशक्तीच्या वतीने नरसी येथे गुरुवारी सकाळी चक्का जाम आंदोलन करण्यात आले.

शेतकरी नापिकीमुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे त्यांचे कर्ज माफ करून 'सातबारा' कोरा करण्यात यावा, अशी जोरदार मागणी आंदोलकांनी केली. यासोबतच, राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, तसेच विधवा महिलांचे व दिव्यांगांचे रखडलेले प्रश्न तात्काळ सोडवावेत, अशाही मागण्या यावेळी मांडण्यात आल्या.

प्रहार जनशक्तीचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी राज्य सरकारच्या जुजबी धोरणांवर टीका करत संपूर्ण राज्यात चक्का जाम आंदोलनाची हाक दिली होती. त्याच पार्श्वभूमीवर, नायगाव तालुकाध्यक्ष गजानन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली दि. २४ जुलै रोजी सकाळी नरसीतील मुख्य चौकात आंदोलनकर्ते एकत्रित झाले. जय जवान, जय किसानच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. दोन तास चक्का जाम आंदोलन करून शासनाच्या विरोधात तीव्र निषेध नोंदवण्यात आला.यावेळी, आंदोलकांनी नायब तहसीलदार विजय येरावार, मंडळ अधिकारी सौ. शितल स्वामी, तसेच तलाठी शाम मुंडे यांच्याकडे निवेदन सादर केले.

आंदोलन शांततेत पार पडावे यासाठी रामतीर्थचे सपोनी विक्रम हराळे यांच्या मार्गदर्शनाखाली नरसी बिटचे जमादार चंद्रमणी सोनकांबळे, पो. हे. कॉ. कामपर्णे, पो. हे. कॉ. गणपत राठोड व अन्य पोलीस कर्मचारी वर्गाचा फौजफाट्यासह मोठा बंदोबस्त तैनात केला होता.

# नांदेडमध्ये मराठा समाजाची बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२५ जुलै -**

मराठा समाजाची पुरोगामी चळवळ मोडून काढून सरकार मराठा समाजाची कोंडी करण्याचा घाट घालत आहे. त्यामुळे सरकारचे मनसुबे उधळून लावून मराठा समाजाबद्दल षडयंत्र रचणाऱ्यांना जशास तसे उत्तर देण्यासाठी समाजाची पुन्हा एकदा ताकद दाखवून देण्यासाठी नांदेडमध्ये रविवार, दि. २७ जुलै रोजी वज्रमूठ राज्यव्यापी बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष माधव देवसरकर यांनी दिली.

# गायरान जमिनीत बेकायदेशीर उत्खनन शासनाची दिशाभूल करून मुरुम विक्रीचा प्रकार उघड

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.२५ जुलै -**

तालुक्यातील गागलेगांव येथील सर्वे नं. ७८ मधील सरकारी गायरान जमिनीत परवान्याशिवाय मोठ्या प्रमाणावर मुरुम उत्खनन करून शासनाची दिशा भूल करण्यात येत आहे, असा गंभीर प्रकार समोर आला आहे.

सदर प्रकरणात, गट क्रमांक ७९ या खाजगी शेत जमिनीसाठीच फक्त उत्खनन परवाना काढण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात उत्खनन हे बाजूच्या गायरान सर्वे नं. ७८ मधूनच सुरू असून, सुमारे ३ हेक्टर २८ आर क्षेत्रात जेसीबी व २५ हायवा वाहनांच्या साहाय्याने दिवसेंदिवस बेकायदेशीर मुरुम उत्खनन सुरू आहे. हे सर्व काम संबंधित गुत्तेदार व परवाना धारक यांच्यातील संगनमताने केलं जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. हे उत्खनन हे भोकर-धर्माबाद मुख्य रस्त्यालगत सुरू असून, संबंधित ठिकाणी कोणतीही गुत्तेदारांची मालकी हक्क नसताना देखील शासनाच्या जमिनी वर बिनधास्त उत्खनन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे यासाठी गट क्र. ७९ या खाजगी जमिनीचा परवाना दाखवून शासनाची दिशाभूल केली जात आहे. या प्रकरणी स्थानिक महसूल प्रशासन, बिलोली तहसील व मंडळ अधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष केलं जात असल्याचा आरोपही अर्जदार राजेश्वर व्यंकट , व्यंकट मारोती गुजरबाड,रावसाहेब जळबा शिंदे, रामराव पुंडलिक पवार गागलेगांव, शंकर गणपत र नरवाडे कुंभार गांवकर यांनी केला आहे. या प्रकारा मुळे शासनाच्या महसुलाला मोठ्या प्रमाणात गंडा बसत असून, नैसर्गिक संपत्तीचा गंभीर नाश होत आहे.

# विधायक उपक्रमांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.२५ जुलै -**

राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांचा वाढदिवस जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावनगावकर यांच्या उपस्थितीत अर्धापूर येथे आरोग्य शिबिर व वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. यावेळी अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजित पवार साहेबांचा २२ जुलै रोजी वाढदिवस शहराध्यक्ष शेख साबेर यांच्या पुढाकाराने व जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावनगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आरोग्य शिबिर व वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शेख साबेर आत्माराम कपाटे आदींनी आपली मनोगत व्यक्त केले.

ना. अजित दादांचा वाढदिवस पूर्ण राज्यात साजरा करण्यात आला आहे. वाढदिवस हा सामाजिक लोकांशी बांधिलकी ठेऊन सामान्य नागरिक ते जेष्ठांचा सन्मान करण्यापर्यंत विविध विधायक कार्यक्रम आम्ही करत आहोत. वृक्षारोपण व वृक्ष वाटप हे कार्यक्रम आम्ही अग्रक्रमाने राबविले तर आरोग्य शिबिराचा अनेक रूग्णांनी लाभ घेतला असल्याचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावनगावकर यावेळी बोलतांना म्हणाले. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, तालुकाध्यक्ष आत्माराम कपाटे, माजी सभापती बाबुराव हेंद्रे, ज्योती सोनटक्के,संदीप राऊत,विलास कल्याणकर, अनिकेत. मीना देशमुख. आवरदे,शुभम मठपती,महेश राजेगोरे, पवन इंगोले, दत्ता पारवे,किशोर टेकाळे,माधव राजेगोरे, नागेश कपाटे,शिवाजी कल्याणकर,शेख इलियास आदींची उपस्थिती होती.

# आपण जोपर्यंत एकजुटीने आहोत; तोपर्यंत आपली शिकार होणार नाही : पय्याबोधी थेरो

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.२५ जुलै -**

पुज्य भदन्त पय्याबोधी थेरो हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथिल पार्कला भेट देण्यासाठी दिनांक २४ जुलै २०२५ रोजी सिडको येथे २ वाजता येऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून पार्कचे पाहणी केली.यावेळी जेतवन बुध्द विहार येथे धम्मदेशना देताना आपण जोपर्यंत एकजुटीने आहोत; तोपर्यंत आपली शिकार होणार नाही असे सांगितले.

सिडको येथील जेतवन बुद्ध विहार, गुरूवार बाजार येथे उपस्थितांना धम्मदेशना करताना सांगितले आपण जोपर्यंत एकजुटीने आहोत तोपर्यंत आपली शिकार होणार नाही तेंव्हा आपण संघटित असले पाहिजेत, फुस लावणाऱ्याच्या बळी पडले नाही पाहिजे असे विचार मांडले.

सिडको येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील नियोजित जागेचे पाहणी खुरगाव येथील पूज्य भन्ते पय्याबोधी



थेरो यांनी केली व येथील पार्कमध्ये धम्मदेशना केंद्र आपण सर्वांच्या सहकार्याने करू असे सांगितले व या ठिकाणी धम्म परिषदेचे आयोजन करू असे मत त्यांनी व्यक्त केले येथील जागेच्या विकासासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन विकास घडवून आणू असेही ते म्हणाले येथे मी दर महिण्याच्या २४ तारखेला पार्क येथे धम्मदेसना देण्यासाठी येणार आसे ही सांगीतले.तसेच नागलोक बुद्ध विहार सिडको येथे उपस्थित उपासक-उपासिका व धम्मबांधवाना धम्मदेसना दिली. यावेळी सिडकोतील समाज बांधव विलास गजभारे, राजू लांडगे, पत्रकार संभाजी सोनकांबळे, एकनाथ वाघमारे, चंपतराव कांबळे, सम्राट आढाव, प्रदीप हनवते, दीपक जोंधळे, सूर्यकांत सोनसळे, अनिल मोरे, शाहीर गौतम पवार मुन्ना वाडे, संदीप महाबळे, आकाश सोनकांबळे, मनोहर कोकरे, रामराव सरपाते यांच्यासह उपासक - उपासिक व समाज बांधवांचे उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सोनारी फाटा येथे चक्का जाम आंदोलन

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि.२५ जुलै -**

हिमायतनगर तालुक्यातील सोनारी फाटा येथील दिनांक २४ जुलै गुरुवारी पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनात हिमायतनगर तालुक्यातील प्रहारच्या कार्यकत्यांनी मैदानात येऊन गांधीगिरी संपली आता भगतसिंगगिरी सुरू झाली आहे. असे म्हणत आत्तातरी शासनाने तात्काळ मागण्या मान्य करून सलाईनवर असलेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी करून शांततेच्या मार्गाने आंदोलन केले आहे. दरम्यान चक्काजाम



आंदोलनामुळे दोन तास वाहतूक विसकळीत झाली होती.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह शेतमजूर, दिव्यांग आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यासाठी बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. त्यांच्या प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गुरुवार दिनांक २४ रोजी चक्काजाम आंदोलन केलं आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा या मुख्य मागणीसाठी बच्चू कडूंनी विदर्भात पदयात्रा काढली होती. यात्रेदरम्यानच आंदोलनाची दिशा ठरवण्यात आली. आता सरकारला दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी रस्त्यावरची लढाई सुरू झाली आहे. हिमायतनगर तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग सोनारी फाटा येथे सकाळी १० वाजता शांततेच्या मार्गाने चक्का जाम आंदोलन करण्यांत आले. नेते बच्चू कडू यांच्या संघर्षमय कार्याची आठवण ठेवत प्रहार कार्यकर्ते मैदानात उतरले.

त्यांच्या नेतृत्वातून प्रेरणा घेत अनेक कार्यकर्ते जनतेच्या समस्या ऐकण्यासाठी, अन्याया विरोधात आवाज उठवण्यासाठी सज्ज झाले असल्याचे पाहावयास मिळाले. शेतकरी, दिव्यांग, शेजमजुर, मेंढपाळ, मच्छीमार, कामगार आदिसह प्रमुख शेतकरी कर्जमाफी तात्काळ जाहिर करण्यात येऊन शेकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यात यावा. अशी मागणी लावून धरण्यात आली असून, आंदोलना दरम्यान पोलिसांनी प्रहारच्या कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन सोडून दिले असले तरी कार्यकर्त्यांनी शासन आमचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत असल्याचाशेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित अपंग व वंचितांना न्याय मिळावा यासाठी हा छोटासा प्रयत्न असल्याचे सांगत तात्काळ शेतकऱ्यांसह स्थानिक समस्यांवर उपाययोजना करावी. यासाठी आजचे आंदोलन संस्थापक आ. बच्चू कडू, जिल्हा प्रमुख विठ्ठलराव कल्याणकर, हदगांव-हिमायनगर विधानसभा अध्यक्ष अनिल दिगंबर कदम यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले असल्याची माहिती प्रहारचे तालुका प्रमुख दत्ता पंडीतराव देशमुख यांनी दिली आहे. या आंदोलनात शेतकरी, कष्टकरी, दिव्यांग, निराधार सह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

# बीड जिल्हाधिकारी दालनात आ.क्षीरसागर यांची बैठक

## शहर आणि ग्रामीणमधील पाणीपुरवठा, रस्ते, जमीन संपादनाच्या मुद्यांवर सविस्तर चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जुलै**

जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या दालनात बुधवार (दि.२३) रोजु आ. संदीप क्षीरसागर यांनी बीड शहर आणि ग्रामीण भागातील विकासकामांबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. यावेळी अमृत पाणीपुरवठा, रस्ते विकास, जमीन संपादन आणि जलजीवन मिशनच्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी माजी आ.सय्यद सलीम उपस्थित होते.

– बीड शहरातील अमृत पाणीपुरवठा योजनेची कामे कंत्राटदाराच्या ढिसाळ कारभारामुळे रखडली आहेत. यावर उपाय म्हणून मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नगर परिषद आणि कंत्राटदार यांची



जिल्हाधिकारी यांच्या दालनात संयुक्त बैठक आयोजित करण्याचे ठरवले.

– छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगर रोडवरील नवीन सिमेंट रस्ता व दुभाजक झाले आहे. हे दुभाजक होत असताना जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा न्यायालयासमोर वाहनांसाठी रस्ता क्रॉसिंग असणे आवश्यक आहे. याबाबत चर्चा केली.

– राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ एफ वरील खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्याच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या; पण अनेकांना अद्यापपर्यंत मावेजा मिळालेला नाही. त्याबाबतीत मुळ दुरूस्ती, सुधारित निवाडा संबंधी वेळोवळी विभागाला मागणी प्रस्तावित केलेली आहे. याबाबतीत जमीन संपादीत होऊनही आतोनात हाल झाले आहेत. यावर आ.क्षीरसागर यांनी सविस्तर चर्चा केली.

– बीड आणि शिरूर तालुक्यात जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट आणि अपूर्ण असल्याने ग्रामस्थ त्रस्त आहेत. आ. क्षीरसागर यांनी गावनिहाय तक्रारी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासन स्तरावर तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.







# वसा आणि वारसा....

राजकारण आणि समाजकारण यांचा एकत्रित उपयोग जनतेच्या कल्याणासाठी करून सामाजिक उत्थानाचा वसा पुढे नेण्यात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्रातील असंख्य मुंडेप्रेमींच्या गळ्यातील ताईत, लोकनेत्या मा.ना. पंकजाताई मुंडे यांचा आज (२६जुलै) वाढदिवस.



महाराष्ट्रात अनेक राजकीय घराणे आहेत. अनेकांचे वारस राजकारणात आले, मात्र राजकारणाबरोबरच समाजकारण सोबत घेऊन वसा पुढे नेणारे क्वचितच. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेला सेवायज्ञ तेवत ठेवत रंजल्या गांजल्यांची सेवा हाच आपला धर्म मानत पंकजाताई मुंडे यांनी आपला प्रवास सुरू ठेवला आहे. राजकारणात महिला राजकारणी खूप कमी, त्यात स्वतः निर्णय घेण्याची क्षमता असणाऱ्या तर खूपच कमी. पंकजाताई मुंडे राजकारणात आहेत त्या आपल्या स्वबळावर. कमावलेल्या जनतेच्या आशीर्वादावर व आपल्या समाजसेवेच्या घेतलेल्या अविरत वसा यावर. २००९ पासून जनतेशी जुळलेले नाते १६ वर्षांनंतर आणखी घट्ट झाले आहे. जय-पराजय या स्थितीच्या कित्येक मैल पुढे आता पंकजाताई आलेल्या आहेत. जनतेच्या मनावर अधिराज्य असणाऱ्या या नेत्याला आता लोकनेता म्हणून गणले जाते आहे.

अनेक संकटे, संघर्षाच्या वाटेवरून चालून पंकजाताई आता सर्वसामान्यांचे जीवन सुकर व्हावे यासाठी कायम प्रयत्नशील असतात. आपल्या पहिल्या मंत्रिपदाचा काळात जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र पुन्हा एकदा पाणीदार तर शेत शिवार हिरवीगार केली. गरीब शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक प्रगतीची दारे उघडी केली. माझी कन्या भाग्यश्री योजना मुलींना भविष्यात शिक्षण व विवाह यासाठी उपयोगी पडणारी सर्वात लोकप्रिय योजना ठरली आहे. आज प्रत्येक घरातील मुलींचा माझी कन्या भाग्यश्री योजनेत सहभाग आहे. ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून अनेक गावांपर्यंत पक्का रस्ता पोचला. वैद्यकीय अडचणीत गावखेड्यातील खराब रस्त्यांमुळे अनेकांची मृत्यू झाले. मात्र मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून आज पंकजाताई यांच्या दूरदृष्टीने गावोगावी पक्के रस्ते योजना आली व खराब रस्त्यांमुळे तुटलेली ही गावे शहरांशी जोडली गेली. पंकजाताई व माजी खासदार प्रितमताई यांनी घेतलेली महाआरोग्य शिबीरे महाराष्ट्रात सर्वात मोठ्या आरोग्य शिबीरांपैकी शिबिरे होती. या आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून अनेक मोठी खर्चिक उपचार गरजू रुग्णांवर मोफत करण्यात आली. ज्यांनी आर्थिक कारणांमुळे उपचाराची आशा सोडून दिली होती अशा अनेक रुग्णांवर यात मोफत उपचार करण्यात आली.द टर्निंग पॉईंट च्या माध्यमातून मतदारसंघातील प्रत्येक शाळेपर्यंत पोचून गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. अनेक मोठमोठे वक्ते या कार्यक्रमात आणून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. सर्वसामान्य घरातील वधूवरांचे राजेशाही थाटात लग्न लावत सामुदायिक विवाह कार्यक्रम घेत त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक मदत केली. महिलांचा आवडता सण असलेला गौरी गणपती. गौरी गणपती स्पर्धा घेत प्रत्येक घरातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्याचा अनोखा प्रयत्न पंकजाताई यांनी या स्पर्धेच्या माध्यमातून केला. कोरोना काळात रेशन, वैद्यकीय उपचार देत त्यांनी आपला सेवाधर्म पाळला. अश्या एक न अनेक योजना, कार्यक्रम घेऊन सर्वसामान्य रुग्णांना, महिलांना, विद्यार्थ्यांचे जीवन सुकर केले.



आज ना. पंकजाताई मुंडे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात महत्वाच्या मंत्रिपदावर विराजमान झालेल्या आहेत. पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन सारखे संवेदनशील खाते त्यांच्याकडे आहे. परळीत आधुनिक पशुवैद्यकीय दवाखाना व पशुवैद्यकीय महाविद्यालय त्यांनी मंजूर केले आहे. याचा परळीकरांना मोठा फायदा होणार आहे. मंत्रिपद मिळताच त्यांनी अनेक निर्णय घेत राज्याचे पर्यावरण पुन्हा एकदा शुद्ध करण्यासाठी धडाकेबाज निर्णय घेतले आहेत. भविष्यात ना. पंकजताई मुंडे यांच्या रूपाने व जनतेच्या प्रेमाने घेतलेला वसा आणि वारसा चालत राहील.

पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा.

**अश्विन मोगरकर,**
**परळी वैजनाथ.**

# संयमी नेतृत्व



**■ प्रदीप कुलकर्णी ■**

पंकजाताई मुंडे...महाराष्ट्राच्या राजकारणातला एक वलयांकित चेहरा..एक दमदार, कणखर, आक्रमक व तितकच संयमी नेतृत्व म्हणूनही महाराष्ट्र त्यांना ओळखतो. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा सक्षम राजकीय वारसा समर्थपणे पुढे घेऊन जात असताना राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेलं हे उमदे व्यक्तीमत्व.. समाजातील वंचित, पिडित घटकांच्या सेवेसाठी ज्यांनी आपले आयुष्य वेचले, त्या मुंडे साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांचे अधुरे स्वप्न पुर्ण करण्याचा ध्यास घेत, येणा-या प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे हे धुरंधर नेतृत्व आज सर्व सामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे.

पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. तरीही त्यावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी-अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं आणि करत आहेत. महाराष्ट्रातील लाखो-करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन् प्रेमाची भावना आहे, हिच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते.

पंकजाताई कधी कोणाचं वाईट चिंतणार नाहीत की करणार नाहीत, त्या त्रास सहन करणाऱ्या पैकी आहेत, देणाऱ्या पैकी मुळीच नाहीत, ही भावना, हा आदर त्यांच्याविषयी सामान्य कार्यकर्त्यां मध्ये आहे.

लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणत, ज्यांचा कुणी वाली नाही, ज्यांची कुणी वाणी नाही अशा लोकांसाठी मी आहे, अगदी तोच आदर्श आणि तेच संस्कार पुढे घेऊन पंकजाताई राजकारण व समाजकारणात वाटचाल करत आहे. पंकजाताई हया जरी मुंडे साहेबांची लेक, त्यांच्या राजकीय वारसदार असल्या तरी आज राजकारणात त्यांनी जे स्थान निर्माण केले आहे, ते केवळ आपल्या स्वकर्तृत्वावर.., हे विसरून चालणार नाही. पद अथवा सत्ता असो वा नसो, त्यांचं संघटना आणि सामान्य जनतेसाठी असलेलं काम अव्याहतपणे सुरूच असतं. २०१९ ला विधानसभेत त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले पण त्या खचल्या नाहीत, पुन्हा तितक्याच नव्या जोमाने कामाला लागल्या, संघटन कार्यात स्वतःला झोकून दिले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बीडमधून त्यांना उमेदवारी मिळाली. इथे विरोधकांकडून अफाट जातीपातीचा विखारी प्रचार झाला, त्यातही त्यांनी कडवी झुंज दिली पण निसटता पराभव झाला. त्यानंतर आलेल्या विधानसभा निवडणुकीत हक्काचा परळी मतदारसंघ सुटला, पण न खचता त्या पक्षासाठी पुन्हा जोमाने कामाला लागल्या आणि जवळपास चाळीस मतदारसंघात त्यांनी भाजपचे आमदार निवडून आणले. तहान भूक विसरून पक्षासाठी दिवसरात्र काम करताना स्वतःच्या आरोग्याकडेही त्यांनी लक्ष दिले नाही. शेवटी पक्ष नेतृत्वाला सुध्दा त्यांच्या कष्टाची दखल घेणे भाग पडले, त्यांना विधानपरिषदेवर संधी मिळाली. पुढे लगेच काही दिवसांनी भाजप महायुतीची सत्ता आली आणि त्यांना कॅबिनेट मंत्री पद मिळाले. संघटनेप्रती असलेली निष्ठा, अपार कष्ट करण्याची तयारी हे त्यांचं कर्तृत्व खरोखरच वाखाणण्यासारखं आहे.

मिळालेल्या प्रत्येक संधीचं सोनं

पंकजाताईंना कोणतेही खाते मिळो, त्यात त्या अभ्यासूपणाने त्याचं सोनं करतातच, हे यापूर्वी देखील सिध्द झाले आहे. सामान्य जनतेशी फारसा थेट संबंध नसलेलं, कमी बजेटच पर्यावरण व पशुसंवर्धन खातं त्यांना मिळालं पण त्यातही जबरदस्त काम करून त्यांनी आपला ठसा उमटवला. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य त्यांनी केलं. पशुसंवर्धन अधिकाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्याचा धाडसी निर्णय, मेंढपाळांच्या थेट खात्यात चराई अनुदान,परळी- बारामतीत पशुवैद्यकीय महाविद्यालय, नो प्लास्टिक मोहीम, महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरणात बदल करून शेतीसाठी ई वाहन, वसुंधरा बचाव अभियान आदी महत्वाचे निर्णय त्यांनी मंत्रीपदाच्या केवळ सहा महिन्यांत घेतले, त्यांचं नियोजनबद्ध आणि गतिशील कामाचे यापेक्षा दुसरे उदाहरण काय असू शकेल. नुकत्याच झालेल्या अधिवेशनात पंकजाताई मुंडे यांच्या लढावू बाण्याचे दर्शन सभागृहाला झाले. एकच विषय घेवून विरोधी व सत्ताधारी आमदारांकडून त्यांचेवर प्रश्नांची चौफेर सरबत्ती करण्यात आली पण त्यांनी अशी काही खिंड लढवली की, त्यांनी दिलेल्या उत्तराचे उपसभापतींनी देखील जाहीर कौतुक केलं, ही खरं तर त्यांच्यातील अभ्यासू गुणांची चुणूक म्हणावी लागेल.

नेता मिळे आम्हा ऐसा, मग काय असे उणे..!

पंकजाताईंच नेतृत्व सर्वांनाच हवहवसं वाटणार असं आहे. लोकसभेत निसटता पराभव झाल्यानंतर त्यांचे समर्थक सैरावैरा झाले. त्यांचा पराभव जिव्हारी लागल्याने पाच तरूणांनी स्वतःचा जीव दिला. या घटनेने त्यांना खूप वेदना झाल्या, त्यांनी या तरूणांच्या परिवाराची भेट घेऊन त्यांना मायेचा आधार दिला. मध्यंतरी गेवराई तालुक्यात एका तांड्यावरील ऊसतोड मजूर दाम्पत्य अपघातात मृत्यूमुखी पडले, त्याच्या कुटूंबाचाही त्या आधार बनल्या. बीड मधील भाजपचे विस्तारक बाबासाहेब आगे यांची हत्या झाल्यानंतर त्याही परिवाराच्या मदतीला त्या धावल्या. सामान्य माणूस असो की कार्यकर्ता प्रत्येकाला आपलं वाटणार त्यांच नेतृत्व आहे, वंचितांच्या या माऊलीला सर्वांनी जपावं. पंकजाताईचे नेतृत्व भविष्यात एका मोठ्या उंचीवर जावं ही प्रत्येकाची इच्छा आहे. गोरगरीब, सामान्य माणसाचे आशीर्वाद त्यांच्या पाठिशी असल्याने ही इच्छा नक्की पूर्ण होईल यात तीळमात्र शंका नाही.

# ताईसाहेब मंत्री झाल्या, डोळ्याचे पारणे फिटले

## आमदार नमिताताई मुंदडा यांनी व्यक्त केल्या भावना



**२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शेवटच्या क्षणी मला उमेदवारी मिळाली आणि त्याचे श्रेय पूर्णपणे ताईसाहेबांना म्हणजेच मा. ना. पंकजाताई मुंडे यांनाच जाते. त्यांच्याच आशीर्वादाने मी आमदार झाले. त्यावेळी विधानभवनात त्या माझ्यासोबत नव्हत्या, ही खंत होती. मात्र २०२४ मध्ये पुन्हा त्यांच्याच नेतृत्वामुळे माझा विजय झाला आणि आता त्या कॅबिनेट मंत्री झाल्या आहेत, हे पाहून मनोमन आनंद आणि समाधान वाटत आहे, असे भावनिक उद्गार आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांनी व्यक्त केले.**

आमदार मुंदडा पुढे म्हणाल्या, केज विधानसभा मतदारसंघात गेल्या पाच वर्षांमध्ये २,००० कोटींपेक्षा अधिक विकासकामं मार्गी लागली. ग्रामीण भागापासून ते शहरापर्यंत पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. हे सर्व ताईसाहेबांच्या पाठबळामुळे शक्य झाले. मंत्रीपदाच्या माध्यमातून त्यांचं मार्गदर्शन अधिकच बळ देणार आहे.

राजकीय नातं जिव्हाळ्यात रूपांतरित

नमिताताईंनी सांगितले की, राजकीय नातं हळूहळू कौटुंबिक जिव्हाळ्यात परिवर्तित झालं. पंकजाताईंनी मला त्यांच्या भगिनी प्रितमताई, येशुताईसारखंच प्रेम दिलं. त्या केवळ राजकारणातल्या नेत्या नसून आमच्यासाठी मातृतुल्य व्यक्तिमत्व आहेत. माझ्या मुलींवर त्यांनी अगदी स्वतःच्या मुलासारखे प्रेम केलं, काळजी घेतली. आजही आमचं दैनंदिन संवाद असतो. जनतेची कामे कशी करावीत?, विकासाचे प्रश्न कसे मार्गी लावावेत? लोकांच्या सोबत संवाद कसा करावा? सामान्य लोकांचे प्रश्न कसे सोडवावेत? या बाबतीतले सारे मार्गदर्शन मला ताईसाहेबांनी केलं. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय कोणताही निर्णय घेत नाही.

सत्तेच्या बाहेर असतानाही साथ

लोकसभा निवडणुकीच्या वेळी आमचं संपूर्ण कुटुंब रात्रंदिवस प्रचारात होतं. पराभव होईल असं वाटलंच नव्हतं. मात्र तो धक्का बसल्यानंतर त्यांनीच आमच्या डोळ्यातलं पाणी पुसलं. त्यांच्या नेतृत्वात संयम, संघर्ष, त्याग, आणि सेवा वृत्ती आहे. त्यामुळे त्या मंत्री झाल्याचं समाधान शब्दात व्यक्त करता येत नाही, असेही नमिताताईंनी सांगितले.

ताईसाहेब म्हणजे दिव्यदृष्टी असलेलं नेतृत्व

नमिताताईंनी यावेळी मंत्री पंकजाताई मुंडेंच्या नेतृत्वाविषयी गौरवोद्गार काढताना म्हणाल्या, प्रशासनाची सूत्रे कशी चालवायची, लोकसंपर्क कसा ठेवायचा, आणि निर्णय घेताना सर्वसामान्यांचा विचार कसा करायचा हे सर्व आम्ही ताईसाहेबांकडून शिकलो. विधानभवनात त्या आमच्यासोबत आहेत, हे मी माझं भाग्य मानते. त्या मंत्रीपदी विराजमान झाल्याचा आनंद मला माझ्या आमदारकीच्या विजयापेक्षाही अधिक वाटतो.

मातोश्री प्रज्ञाताई, प्रितमताई आणि येशुताई यांच्यासोबत आम्हा साऱ्यांचे एक कौटुंबिक ऋणानुबंध आहेत. मंत्रीपदाच्या माध्यमातून आता ताईसाहेब सतत आमच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या आहेत. त्यांना उत्तम आरोग्य लाभो आणि त्या जनतेची सेवा करत राहाव्यात, हीच माता योगेश्वरीच्या चरणी प्रार्थना, असे नमिताताईंनी आपल्या भावना शेवटी व्यक्त केल्या.

**शब्दांकन : राम कुलकर्णी**